सोमवार, १४ नोव्हेंबर २०२२
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक ११७
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## तिसऱ्या कळवा खाडीपुलाच्या मार्गिकेचे लोकार्पण



**ठाणे :** ठाणेकरांना अंतर्गत वाहतूक कोंडीतून दिलासा मिळावा यासाठी वेगवेगळे प्रकल्प राबवले जात आहेत. त्यात बायपास, ईस्टर्न फ्री वेचा विस्तार यांचा समावेश आहे. एमएमआरडीए आणि ठाणे महापालिका त्यासाठी काम करीत आहे. त्यामुळे सगळे रस्ते वाहतूक कोंडीमुक्त होतील, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी (दि. १३) व्यक्त केला. कळवा खाडीवरील तिसऱ्या पुलाच्या एका मार्गिकेचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण झाले. त्या वेळी ते बोलत होते. कार्यक्रमास खासदार श्रीकांत शिंदे, आमदार जितेंद्र आव्हाड, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी महापौर नरेश म्हस्के, मिनाक्षी शिंदे, माजी उपमहापौर पल्लवी कदम, गोपाळ लांडगे, सुधीर कोकाटे, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मनपा आयुक्त अभिजीत बांगर आदी उपस्थित होते.

अंतरंग
नाट्यमय घडामोडीतून अपहृत बालकाची सुटका/२
पनवेलमध्ये शासकीय योजनांचा महामेळावा/३
उरणच्या अमेघा घरतला कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक/८

# सुषमा अंधारेंना धक्का

## विभक्त पतीचा बाळासाहेबांच्या शिवसेनेत प्रवेश

**ठाणे : प्रतिनिधी**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांचे विभक्त पती ॲड. वैजनाथ वाघमारे यांनी रविवारी (दि. १३) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत बाळासाहेबांच्या शिवसेनेत पक्षप्रवेश केला. या पक्षप्रवेशाच्या निमित्ताने शिंदे गटाने ठाकरे गटाला आणखी धक्का दिला आहे.

दोनच दिवसांपूर्वी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार गजानन किर्तीकर यांनी बाळासाहेबांच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. किर्तीकर यांच्या प्रवेशाने शिंदे गटातील खासदारांची संख्या १३वर गेली आहे. त्यानंतर आता उपनेत्या सुषमा अंधारे यांचे विभक्त पती ॲड. वैजनाथ वाघमारे यांच्यासह अन्य पदाधिकारी शिंदे गटात दाखल झाले आहेत. ठाण्यातील टेंभीनाका येथील आनंद मठात हा पक्षप्रवेश कार्यक्रम झाला. या वेळी ॲड. वाघमारे, माजी आमदार योगेश पाटील, शिवसेनेच्या भारतीय कामगार सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष इरफान शेख तसेच ठाकरे गटासह विविध पक्षांमधील पुणे, लातूर, मुंबई, ठाणे आणि पालघर भागातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांनीही शिंदे गटात प्रवेश केला.

ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत पत्राचाळ घोटाळाप्रकरणी अटकेत असताना सुषमा अंधारे यांनी त्यांची जागा घेण्याचा प्रयत्न केला होता. अखेर राऊतांची जामिनावर सुटका झाली, तर अंधारेंच्या पतीने शिंदे गटाची वाट धरली. त्यामुळे आगामी काळात अंधारे यांना गृहकलहाचा सामना करावा लागणार आहे.



### सुषमा अंधारेंचा पर्दाफाश करणार –ॲड. वैजनाथ वाघमारे

**मुंबई :** ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांचे विभक्त पती ॲड. वैजनाथ वाघमारे यांनी अंधारे यांना थेट इशारा देत त्यांचा पर्दाफाश करणार असल्याचा इशारा दिला आहे. त्याचप्रमाणे गरज पडली, तर त्यांच्याविरोधात निवडणूक लढवेन, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पुढे बोलताना ॲड. वाघमारे म्हणाले की, सुषमा अंधारे यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये जाण्याचा निर्णय घेतल्यानंतर आमच्यात दुरावा आला. त्या भाडोत्री वाहन म्हणून राष्ट्रवादीत गेल्या. त्यानंतर आमच्या नात्याला खऱ्या अर्थाने तडा गेला. त्यांचे विचार वेगळे राहिले आणि माझे विचार वेगळे राहिले. त्या मुलुखमैदान तोफ नसून त्यांना मीच घडवले आहे. चार दिवसांत पत्रकार परिषद घेत त्यांच्याविषयी सगळे सांगणार आहे. त्यांनी एका मंत्र्याला अश्लील आणि अश्लाघ्य पद्धतीने त्रास दिला. त्याच गावात जाऊन पत्रकार परिषद घेणार आहे. त्या वेळी सुषमा अंधारे काय आहेत, कोठून आल्या, काय झाले, कोणी आणले हे सगळे मांडणार आहे.

सुषमा अंधारे इतिहासाचे दाखले देते हे कोणी सांगितले? इतिहासाचे दाखले द्यायला तिला पुस्तक कोणी दिले, असा सवालही या वेळी ॲड. वाघमारे यांनी अंधारे यांना उद्देशून केला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यशैलीने प्रेरित होऊन मी त्यांच्या पक्षात काम करण्याचा निर्णय घेतला, असे सांगून सुषमा अंधारे यांच्याविरोधात निवडणूक लढण्याची वेळ आली तर लढणार का? या प्रश्नावर उत्तर देताना माझे नेते एकनाथ शिंदे आहेत. त्यामुळे माझा नेता, पक्ष जे काम करायला सांगेल ते करेन. तशी वेळ आली तर माझ्यासमोर सुषमा अंधारे असू दे किंवा इतर कोणीही मी निवडणूक लढेन, असे त्यांनी स्पष्ट केले.




# प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या मान्य न झाल्यास ‘गेल’विरोधात आंदोलन

## आमदार प्रशांत ठाकूर यांचा अलिबागमध्ये इशारा

**रेवदंडा, अलिबाग : प्रतिनिधी**

गेल इंडिया कंपनीकडे उसर प्रकल्पग्रस्त शेतमजूर संघटनेच्या वतीने विविध मागण्या करण्यात आल्या आहेत. त्या मान्य न झाल्यास आंदोलनाशिवाय पर्याय नाही, असा इशारा भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी (दि. १३) दिला. ते नाईक कुणे येथे आयोजित बैठकीत बोलत होते.

अलिबाग तालुक्यातील उसर येथील गेल कंपनीत शैक्षणिक पात्रतेनुसार कायमस्वरूपी नियुक्ती मिळावी, राज्य सुरक्षा दलाच्या भरतीमध्ये २५ टक्के स्थानिक लोकांची भरती करावी, प्रकल्पातील अस्थायी भरती नियुक्ती संघटनेच्या समन्वयाने करावी अशा अनेक मागण्यांसह कंपनी व्यवस्थापनाकडून होणाऱ्या अन्यायाविरोधात उसर प्रकल्पग्रस्त शेतकरी संघटनेने आंदोलनाची भूमिका घेतली आहे.

### २१ नोव्हेंबरला ‘गेट बंद’

*प्रकल्पग्रस्तांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात व निषेधार्थ तसेच न्याय हक्क प्राप्त करण्यासाठी २१ नोव्हेंबर रोजी उसर येथील गेल इंडिया कंपनी गेट बंद आंदोलनाचा इशारा उसर, कुणे, घोटवडे, नाईक कुणे, मल्याण ग्रामस्थांच्या प्रकल्पग्रस्त शेतमजूर संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे. याबाबत रायगड जिल्हाधिकारी व गेल इंडिया लि.च्या उसर येथील कंपनी व्यवस्थापनास निवेदन देण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर आमदार प्रशांत ठाकूर यांनी बैठकीत मार्गदर्शन करून आपण तुमच्यासोबत असल्याचे सांगितले.*

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली हा लढा देण्यात येणार आहे. या संदर्भात नाईक कुणे येथील गणपती मंदिराच्या सभागृहात रविवारी बैठक झाली.

या बैठकीस भाजप जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, अलिबाग तालुका अध्यक्ष परशुराम म्हात्रे, सरचिटणीस संतोष पाटील, मुरूड तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, माजी पं.स. सदस्य उदय काठे, ॲड. संतोष पवार, भाजप अलिबाग शहर अध्यक्ष ॲड. अंकित बंगेरा, रोहा तालुका अध्यक्ष सोपान जांभेकर, कृष्णा कोबनाक, शरद थळे, सुजित गावंड, जान्हवी पारेख, पंकज अंजारा, शैलेश नाईक, निखिल चव्हाण, लतिकेश भोईर, समीर नाईक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल प्रकल्पग्रस्तांना शासन दरबारी न्याय मिळावा यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. आंदोलनासंदर्भात ग्रामस्थांनी पत्र दिले व प्रत्यक्षात भेटले. न्याय मिळत नसल्याने प्रकल्पग्रस्तांना आंदोलनाची भूमिका घ्यावी लागत आहे. प्रकल्पग्रस्तांना लवकरात लवकर न्याय मिळावा यासाठी पाठपुरावा केला जाईल. त्यांच्या मागण्या मान्य न झाल्यास आंदोलनाशिवाय पर्याय नाही, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी स्पष्ट केले.

संघटनेचे अध्यक्ष नरेश ठाकूर, उपाध्यक्ष दत्तात्रेय ठाकूर, कार्याध्यक्ष अनंत शिंदे, सेक्रेटरी सुरेश धसाडे, खजिनदार गिरीष पाटील, सदस्य व सल्लागार निलेश गायकर आदींनी ही बैठक यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

## निवडक

### अभिनेत्री कल्याणी कुरळे–जाधवचा अपघाती मृत्यू



**कोल्हापूर :** ‘तुझ्यात जीव रंगला’ फेम अभिनेत्री कल्याणी कुरळे–जाधव हिचा कोल्हापूर–सांगली महामार्गावर अपघाती मृत्यू झाला. कल्याणीने हालोंडी फाटा या ठिकाणी प्रेमाची भाकरी नावाने हॉटेल सुरू केले होते. ते बंद करून बाहेर पडत असताना डंम्परच्या धडकेत तिचा मृत्यू झाला.

### उरणचे ज्येष्ठ साहित्यिक गजानन दर्णे यांचे निधन

**उरण :** केगाव येथील ज्येष्ठ साहित्यिक गजानन दर्णे यांचे शनिवारी (दि. १२) निधन झाले. ते ९३ वर्षांचे होते. त्यांनी स्थानिक नाटकांतही काम केले तसेच क्रिकेटची आवड असल्याने उरण क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्षपदही भूषविले होते. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

# लोटे एमआयडीसीतील डिव्हाईन कंपनीत स्फोट

## पाच कामगार गंभीर जखमी

**रत्नागिरी : प्रतिनिधी**

चिपळूणजवळील लोटे एमआयडीसीतील डिव्हाईन केमिकल कंपनीत रविवारी (दि. १३) भीषण स्फोट होऊन यात पाच कामगार होरपळले आहेत. कंपनीत फॅब्रिकेशनचे काम सुरू असताना केमिकलने पेट घेतल्याने हा स्फोट झाल्याची माहिती समोर आली आहे.

या दुर्घटनेत पाच कामगार होरपळले असून त्यांना चिपळूण येथील लाईफ केअर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यातील तिघांची प्रकृती गंभीर असल्याचे समजते.



आग लागल्याचे समजताच एमआयडीसी अग्निशमन दलाने घटनास्थळी जाऊन आग विझविली. या आगीत कंपनीचेही नुकसान झाले आहे.

लोटे एमआयडीसीत यापूर्वीही अनेकदा दुर्घटना घडल्या असून अनेक कामगारांना जीवही गमवावा लागला आहे. डिव्हाईन कंपनीतील स्फोटानंतर स्थानिक अधिकारी, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी व पोलीस घटनास्थळी दाखल झाले. ते स्फोटप्रकरणी अधिक माहिती घेत होते.

# खोपोलीत संमोहन करून महिलेस लुटले

**खोपोली : प्रतिनिधी**

फळविक्रेत्या महिलेस संमोहित करून दागिने, रोख रक्कम व मोबाईल घेऊन चोरट्याचे पलायन केल्याची घटना शनिवारी (दि. १२) घडली. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

खोपोलीतील क्रांतीनगर येथे राहणारी एक महिला पंत पाटणकर चौकात हातगाडी लावून फळविक्री करते. एका अनोळखी व्यक्तीने शनिवारी सायंकाळी ४च्या सुमारास तिच्याजवळ येऊन तुम्हाला लॉटरी लागली आहे, पण काही रक्कम भरावी लागेल असे सांगून गप्पांमध्ये रंगवून संमोहन केले. मग या महिलेने अनोळखी व्यक्तीला घरी नेऊन दागिने, रोख रक्कम व मोबाईल त्याच्याकडे दिले. या वेळी त्या व्यक्तीने दागिन्यांचे वजन करावे लागेल, असे सांगून महिलेस मोटरसायकलवर नेऊन शांतीनगर येथे सोडले. त्यानंतर तो गायब झाला. भानावर आल्यानंतर आपण काहीतरी चुकीचे केले व लुटलो गेलो हे समजल्यावर महिलेने खोपोली पोलिसांत धाव घेतली. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे.

# मुंबई विमानतळावर तब्बल ३२ कोटींचे सोने जप्त

**मुंबई : प्रतिनिधी**

सीमा शुल्क विभागाच्या एअर इंटेलिजन्स युनिटने मुंबई विमानतळावर एका दिवसात ३२ कोटी रुपयांचे ६१ किलो सोने जप्त केले आहे. या प्रकरणी सात आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

**सात जण ताब्यात**

मुंबई विमानतळावर एका दिवसात आतापर्यंतची ही सर्वांत मोठी कारवाई आहे. यातील पहिल्या घटनेत टांझानियावरून आलेले चार आरोपी, तर दुसऱ्या प्रकरणात दुबईवरून आलेले तीन प्रवासी म्हणजे एकूण सात प्रवाशांना अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये पाच पुरुष आणि दोन महिला प्रवाशांचा समावेश असल्याची माहिती मुंबई एअरपोर्ट कस्टम विभागाने दिली.

### तस्करीचे रॅकेट

यातील पहिल्या घटनेत अटक करण्यात आलेले आरोपी हे कतार एअरवेजच्या विमानाने मुंबईत आले होते. त्यांना भारतात सोने आणण्यासाठी पैशाचे प्रलोभन दाखविण्यात आले होते, पण त्यांना भारतातील सीमाशुल्क कायद्याबाबत माहिती नव्हती. त्यामुळे हे सर्व जण एवढे सोने घेऊन आले. आरोपींनी सोने तस्करीच्या रॅकेटशी संबंधित काही लोकांची नावे पोलिसांना दिली आहेत. तपास यंत्रणा त्या लोकांची माहिती काढत आहे, अशी माहिती कस्टमच्या वतीने न्यायालयात देण्यात आली.

# टी–२०मध्ये इंग्लंड दुसऱ्यांदा विश्वविजेते

## अंतिम सामन्यात पाकिस्तानवर केली मात

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

इंग्लंडने पाकिस्तानचा पाच विकेट्सनी पराभव करीत टी–२० विश्वचषकावर दुसऱ्यांदा आपले नाव कोरले आहे. विशेष म्हणजे इंग्लंडने मागील वनडे वर्ल्डकपदेखील जिंकला होता.

इंग्लंडने पाकिस्तानची २० षटकांत ८ बाद १३७ धावा अशी अवस्था केली होती. प्रत्युत्तरात पाकिस्ताननेदेखील इंग्लंडला पॉवर प्लेमध्ये धक्के दिले. अशा वेळी इंग्लंडचा अष्टपैलू खेळाडू बेन स्टोक्सने नाबाद अर्धशतकी खेळी करीत (५२ धावा) मोठे योगदान दिले. स्टोक्स आणि मोईन खानने (२९ धावा) आक्रमक फटकेबाजी करीत इंग्लंडचा विजय निश्चित केला.

तत्पूर्वी, इंग्लंडच्या सॅम करनने पाकिस्तानच्या फलंदाजीचे कंबरडेच मोडले. त्याने चार षटकांत फक्त १२ धावा देत सर्वाधिक तीन बळी टिपले. त्यालाच सामनावीराचा किताब देण्यात आला. पाकिस्तानकडून शान मसूदने सर्वाधिक ३८ धावा केल्या. **(सविस्तर वृत्त पान ८ वर..)**




# डायबेटिस जनजागृती मॅरेथॉनला पनवेलमध्ये प्रतिसाद





(छाया : लक्ष्मण ठाकूर)

या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

**पनवेल : वार्ताहर**

समाजात मधुमेहाविषयी जागरूकता आणि मधुमेह व्यवस्थापनात व्यायामाचे महत्त्व वाढावे यासाठी रोटरी क्लब व रोट्रॅक्ट क्लब ऑफ पनवेल होरायझन आणि डायबेटिस हेल्थ फाउंडेशन ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष मॅरेथॉन रविवारी (दि. १३) नवीन पनवेल येथील डी मार्टसमोरील मैदानात आयोजित करण्यात आली होती. भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झेंडा दाखवून या स्पर्धेला सुरुवात करण्यात आली.

मधुमेह आणि त्याच्या संभाव्य गुंतागुंतीमुळे कुटुंब आणि समाजावर आरोग्यसेवेचा भार पडतो. या पार्श्वभूमीवर रोटरी क्लब व रोट्रॅक्ट क्लब ऑफ पनवेल होरायझन आणि डायबेटिस हेल्थ फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने या आजाराने त्रस्त व उपचार घेऊ शकत नसलेल्या गरजू, गरीब रुग्णांसाठी इन्सुलिन बँक संकल्पना आखण्यात आली आहे. या इन्सुलिन बँकेच्या माध्यमातून गरजू रुग्णांना रेशनिंगच्या स्वरूपात इन्सुलिन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या मॅरेथॉनमधून येणाऱ्या डोनेशन रकमेचा उपयोग डायबेटीस हेल्थ फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्टकडून इन्सुलिन बँक उभारणीसाठी केला जाणार आहे.

दोन गटांत झालेल्या या मॅरेथॉनमध्ये सुमारे ५००हून अधिक नागरिकांनी सहभाग घेतला. या उपक्रमाला रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स व अन्य सेवाभावी संस्थांनी हातभार लावला. विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. या वेळी माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, रोटरी क्लब ऑफ पनवेल होरायझनचे अध्यक्ष स्वप्नील गांधी, सेक्रेटरी विनीत परमार, खजिनदार अंकित शहा, डायबेटिस हेल्थ फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. गणेश हांडे, खजिनदार स्वाती हांडे, सेक्रेटरी कविता बोराडे, ट्रस्टी अमित धवडे, रोट्रॅक्ट क्लब ऑफ पनवेल होरायझनच्या अध्यक्ष इशा शिंदे, रोटरी सदस्य अभिजित सावळेकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

# ...तर उद्योजक राज्याबाहेर गेले नसते

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंची विरोधकांवर टीका



**सांगली : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे यांचा मुख्यमंत्रिपदाचा सर्व काळ हा राष्ट्रवादी आणि काँग्रेसला सांभाळण्यात गेला. त्यांना उद्योजकांशी देणेघेणे नव्हते. ते बोलत नाहीत म्हणून त्यांचे आमदार त्यांना सोडून गेले, तर त्यांच्या काळात उद्योजक महाराष्ट्राबाहेर का जाणार नाहीत? आघाडीच्या अडीच वर्षांच्या काळातील चुकांमुळे औद्योगिक प्रकल्प महाराष्ट्राबाहेर गेले आणि त्याचे खापर मात्र शिंदे-फडणवीस सरकारवर फोडण्यात येत आहे, अशी टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी रविवारी (दि. १३) सांगली येथे केली.

सांगली जिल्ह्याच्या संघटनात्मक प्रवासात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. या वेळी कामगारमंत्री सुरेश खाडे, खासदार संजय पाटील, सांगली शहर जिल्हाध्यक्ष दीपक शिंदे, सांगली ग्रामीण जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज देशमुख, आ. गोपीचंद पडळकर आणि पश्चिम महाराष्ट्र विभागीय संघटनमंत्री मकरंद देशपांडे उपस्थित होते.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, राज्यात गुंतवणूक व्हायची असेल तर उद्योजकांशी चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्री उपलब्ध हवेत. महाविकास आघाडी सरकारच्या काळात मुख्यमंत्री १८ महिने मंत्रालयात फिरकले नाहीत. वरिष्ठ सचिवांनाही मुख्यमंत्र्यांना भेटण्यासाठी वाट पहावी लागे. ते कोणाशी बोलण्यासाठी उपलब्ध नव्हते. त्यांच्या काळात औद्योगिक गुंतवणुकीसाठी मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठका होत नव्हत्या, उद्योगांना जागा दिली जात नव्हती, करार होत नव्हते, पर्यावरण परवानग्या दिल्या जात नव्हत्या, उद्योजकांचे शंकानिरसन केले जात नव्हते. यामुळे महाविकास आघाडी सरकारमुळे एकेक प्रकल्प राज्याबाहेर गेले आणि त्याचे खापर मात्र शिंदे-फडणवीस सरकारवर फोडण्यात येत आहे.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा राज्यात आली असताना पक्षात चैतन्य निर्माण होण्याऐवजी काँग्रेसचे कार्यकर्ते भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश करत आहेत. कोल्हापूरमध्ये काल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी, तर त्यापूर्वी सातारा, ठाणे, मीरा भाईंदरमधील काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यामुळे काँग्रेस कार्यकर्ते भाजपत का प्रवेश करीत आहेत, हा त्या पक्षासाठी चिंतनाचा विषय आहे.

### भाजपमध्ये कार्यकर्त्यांना सन्मान

**भारतीय जनता पक्ष निष्ठावंत कार्यकर्त्यांना पाठबळ आहे आणि नव्याने आलेल्या कार्यकर्त्यांचा सन्मान आहे. भाजपमध्ये आम्ही सत्तेसाठी नाही, तर राष्ट्रासाठी आणि विचारासाठी काम करतो, हिच पक्षातील सर्वांची भूमिका आहे. गटातटाचे राजकारण करणाऱ्यांना भाजपमध्ये स्थान नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.**

# नाट्यमय घडामोडीतून अपहृत बालकाची सुरतेहून सुटका



**पनवेल : वार्ताहर**

डोंबिवलीमधून अपहरण झालेल्या बालकाची नाट्यमय घडामोडीतून मानपाडा पोलिसांनी अखेर सुटका केली.

डोंबिवली येथील रणजीत सौमेंद्र झा (वय ४२) यांचा १२ वर्षांचा मुलगा रूद्र हा ट्यूशनसाठी गेला असता त्याचे अपहरण करण्यात आले. त्यानंतर अपहरणकर्त्यांनी झा यांना फोन करून पैशाची मागणी केली. तत्परतेने झा यांनी मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे वेगाने फिरवली.

मुलाच्या तपासासाठी विविध २० पथके तयार करण्यात आली. प्राथमिक तपासात अपहरणातील गाडीचा माग काढण्यासाठी पोलीस पथके जव्हार मोखाडा परिसरात रवाना झाली, परंतु आरोपींनी बनावट नंबरप्लेट वापरून आडमार्गाने, गावखेड्यातून गाडी नेली.

स्थानिक पोलीस तसेच गुजरात राज्यातील स्पेशल ऑपरेशन ग्रुप यांच्या मदतीने तलासरी- अच्छाडनाका परिसरात बंदी लावली. आरोपीने त्याच्या पालघर येथील घरातील सर्व सामान एका मालवाहू टेम्पोमध्ये सुरतला पाठविले आहे. या माहितीवरून सुरत येथे असणाऱ्या पथकाने मालवाहू टेम्पो शोधून त्याच्या चालकाकडे चौकशी केली.

आरोपीचे घर शोधून काढले व छापा टाकला. यात मुख्य आरोपी फरहदशहा फिरोजशहा रफाई (वय २६) फरहदशहाचा मेहुणा प्रिंसकुमार रामनगिना सिंग (वय २४), प्रियसी शाहीन शाबम मेहतर (वय २७), बहिण फरहीन प्रिंसकुमार सिंग (वय २०) व पत्नी नाझिया फरहद रफाई (वय २५) यांच्या मुसक्या आवळून अपहृत बालकाची सुटका केली.

# जीवनशैली बदलल्याने आरोग्याची काळजी घ्या -प्रवीण साळुंखे

**कर्जत : प्रतिनिधी**

आरोग्य आणि शरीर आपल्या जीवनातील महत्त्वाचा भाग असून बदललेल्या जीवनशैलीमुळे आपल्याला अनेक आजार जडले आहेत. आपले शरीर स्वस्थ असेल तर आपोआप कुटुंबाचे रक्षक म्हणून जबाबदारी घेवू शकेल आणि त्यासाठी आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन हेल्थ वेलनेस कोच आणि आरोग्य आंतरराष्ट्रीय व्याख्याते प्रवीण साळुंखे यांनी कर्जत येथे केले.



कर्जत येथील रॉयल गार्डन सभागृहात डीएक्सएन प्रसारक अनिल भोसले यांच्या पुढाकाराने आरोग्य जनजागृती अभियानानिमित्त निरोगी शहर निरोगी गाव अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी आंतरराष्ट्रीय हेल्थ कोच प्रवीण साळुंखे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांचे हस्ते प्रवीण साळुंखे यांचे स्वागत केले. या वेळी अनिल भोसले, इतिहास संशोधक वसंत कोळंबे, माजी नगरसेवक कृष्णा घाडगे, मनोहर थोरवे, राजाभाऊ कोठारी, उत्तम शेळके, केशव मुने, ज्ञानेश्वर भालीवडे, बाळकृष्ण सावंत, वसंत शिंदे, एम. डी. बार्शी, प्रवीण पाटील, प्रकाश लाड, राजेश इथापे आदींसह नागरिक उपस्थित होते.

# मुंबईकरांच्या सेवेत लवकरच दोन हजार बेस्ट होणार दाखल

**मुंबई : प्रतिनिधी**

येत्या काही महिन्यांमध्ये मुंबईकरांच्या सेवेत बेस्टच्या आणखी दोन हजार बसगाड्या दाखल होणार आहेत. मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत या बसगाड्यांच्या परवान्याला मंजुरी देण्यात आली. आता या दोन हजार बसगाड्या सेवेत दाखल करण्याबाबत बेस्ट उपक्रमाकडून नियोजन करण्यात येणार आहे.



मुंबईकरांच्या सेवेत सध्या तीन हजार ६७९हून अधिक बसगाड्या असून साध्या बसबरोबरच मिनी, मिडी आणि वातानुकूलित मोठ्या आकाराच्या बसचा त्यात समावेश आहे. उपक्रमाने येत्या काही वर्षांत बेस्टच्या ताफ्यातील बसगाड्यांची संख्या दहा हजारपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. लवकरच ताफ्यात दुमजली वातानुकूलित बसगाड्यांचा समावेश करण्यात येणार आहे. वातानुकूलित बस ऑक्टोबरपर्यंत प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार होती, मात्र या बसची पुण्यात चाचणी सुरू असल्याने सेवेत दाखल होण्यास तिला विलंब होण्याची शक्यता आहे.

आता आणखी दोन हजार बसगाड्या ताफ्यात दाखल करण्यासाठी आवश्यक नव्या परवान्यास मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. यामुळे भविष्यात मुंबईकरांच्या सेवेसाठी अधिक बस धावतील आणि प्रवाशांचा प्रवास सुकर होईल, असे प्राधिकरणाच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

# उरण येथे नेत्रचिकित्सा शिबिराला प्रतिसाद

**उरण : वार्ताहर**

ब्राह्मण सभा आणि स्टेटस आय क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने उरण येथे नेत्रचिकित्सा शिबिर शनिवारी (दि. १२)झाले. सुमारे ७० नागरिकांनी डोळे तपासले.



लक्ष्मी नारायण मंदिर येथे ब्राह्मण सभा हॉल येथे हे शिबिर घेण्यात आले. या शिबिरात ७० नागरिकांनी डोळे तपासून घेतले. अल्प दारात चष्मे वाटपही करण्यात आले.

शिबिर यशस्वी करण्यासाठी ब्राह्मण सभेतर्फे उपाध्यक्ष हनुमंत आर्य, सेक्रेटरी वैभव रेईलकर, खजिनदार हेमंत धामणकर, विश्वस्त विराम उपाध्ये, सदस्य प्रभाकर दाते, तसेच ब्राह्मण सभेतर्फे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी विशेष प्रयत्न केले.

# शेतकऱ्यांकडून भात झोडणीची कामे जोमात

**पनवेल, उरण : रामप्रहर वृत्त**

पनवेल, उरण तालुक्यासह जिल्ह्यामध्ये भातकापणीच्या कामांना वेग आला असून मजुरांसह शेतकरी, त्यांचे कुटुंबीय, मित्रमंडळी, गावातील तरुण कापणीसाठी मदतीला येत आहेत. आतापर्यंत जवळपास ८० टक्क्यांहून अधिक भातकापणीची कामे पूर्ण झाली असून पुढील पाच दिवसांत १०० टक्के कामे पूर्ण होण्याची शक्यता कृषी विभागाने व्यक्त केली आहे. सध्या ग्रामीण भागात सर्वत्र भात झोडणीची व वाढवणीची कामे सुरू असल्याचे चित्र दिसत आहे.



रायगड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात भात लागवड करण्यात येते. यंदा पाऊस समाधानकारक पडल्याने भाताची रोपे चांगली तयार झाली होती, मात्र परतीच्या पावसामुळे भातकापणी लांबणीवर गेली. दिवाळी झाल्यावर जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी भातकापणीला सुरुवात झाली. पहाटे पाच वाजल्यापासून सकाळी दहावाजेपर्यंत, त्यानंतर काही ठिकाणी दिवसभर मजुरीवर भातकापणीची कामे सुरू आहेत, तर काही शेतकऱ्यांनी भातकापणी करून जागेवरच झोडणी सुरू केली.

काही ठिकाणी कापणी करून शेतावर अथवा माळावर भाताची उडवी रचण्याचे काम सुरू आहे. या वर्षी भातपीक चांगले आले आहे. ग्रामीण भागात अजूनही भातझोडणी हातानेच करून भात वाढवणी केली जाते.

# पुणे ठरले राज्यातील सर्वांत थंड हवामानाचे शहर

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे शहरात सलग तिसऱ्या दिवशी राज्यातील नीच्चांकी १३.४ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. त्यामुळे शनिवारी (दि. १२) पुणे राज्यातील सर्वांत थंड शहर ठरले. पुणे वेधशाळेने दिलेल्या अंदाजानुसार रविवारपासून शहरात दुपारनंतर अंशत: ढगाळ स्थिती राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे तापमानात काही प्रमाणात वाढ होऊ शकते.

पुणे शहर आणि परिसरात यंदाच्या हंगामात पाच वेळा राज्यातील नीच्चांकी तापमानाची नोंद झाली आहे. ३० ऑक्टोबरला शहरात १२.६ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली होती. यंदाच्या हंगामातील पुण्यातील हे नीच्चंकी तापमान ठरले. त्याच दिवशी हे तापमान राज्यातही नीचांकी होते. त्यानंतर ३ नोव्हेंबरला १३.१ अंश सेल्सिअस राज्यातील नीचांकी तापमानाची नोंद झाली होती. पुण्यात गुरुवारी (दि. १०) १२.८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. हे तापमान पुन्हा राज्यातील नीचांकी तापमान ठरले. त्यानंतर शुक्रवारी (दि. ११)१२.८ अंश सेल्सिअस राज्यातील नीचांकी किमान तापमानाची नोंद शहरात झाली. हे तापमान सरासरीच्या तुलनेत २.९ अंशांनी कमी होते. शनिवारी (दि. १२) सलग तिसऱ्या दिवशीही १३.४ अंश सेल्सिअस किमान तापमान राज्यातील नीच्चांकी तापमान ठरले.

# रोह्यात लायन्स क्लबतर्फे मधुमेह तपासणी

**धाटाव : प्रतिनिधी**

जागतिक मधुमेह दिन १४ नोव्हेंबर रोजी साजरा करण्यात येतो. त्यानिमित्त रविवारी (दि. १३) लायन्स डिस्ट्रिक्टच्या वतीने इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये सकाळी ९ ते दुपारी ३ या कालावधीत ६००० जणांची मधुमेह तपासणी करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

यातील सहभाग म्हणून लायन्स क्लब रोहाच्या वताने करीत मधुमेह तपासणी शिबिरात एकूण ८० जणांची मधुमेह तपासणी करण्यात आली. रोह्यातील प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी सभागृहात हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला रोहा ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिष्ठाता डॉ. अंकिता खैरकर यांनीही सदिच्छा भेट दिली. शिबिरादरम्यान उपस्थित नागरिकांना डॉ. तुषार राजपूत यांनी मार्गदर्शन करताना मधुमेह आजाराबाबत व उपचाराबाबत मार्गदर्शन केले. डॉ. अपूर्वा क्षीरसागर व डॉ. रूपेश होडबे यांनीही संवाद साधला. मृणाल गुजर, सुरेखा गोरे व शिवानी पावसे यांनी तपासणी केली. इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सकरीता निरिक्षक म्हणून रोहा नगर परिषद उर्दू शाळेचे मुख्याध्यापक गजनफर हसन कलाब यांनी काम पाहिले.



या वेळी नुरूद्दीन रोहावाला, डॉ. कृष्णा जरग, पराग फुकणे, दिलीप तलवार, शिरिष सातपुते. लक्ष्मण शिट्याळकर, प्रभातसिंह गिरासे, भाऊसाहेब माने, सुश्मिता शिट्याळकर, प्रद्युत कुळकर्णी, वर्षा सातपुते, सुषमा तलवार, रशिदा रोहावाला, इलयाज डबीर, अलेफिया रोहावाला, प्राची कुळकर्णी, अनघा माने, स्वराली फुकणे, जुमाना रोहावाला, माया शहा, वर्षाराणी जरग, नचिकेत फुकणे हे लायन्स क्लब रोहाचे सदस्य सहभागी झाले होते. शिबिर आयोजित करण्यासाठी प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढीचे अध्यक्ष संतोष खलपकर, संतोष यादव, राजेश शेलार यांनी सहकार्य केले.

# आवक घटल्याले लाल मिरचीचे भाव वधारले



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवाळी सणासुदीनंतर मिरचीची आवक वाढायला सुरुवात होते, मात्र वर्षभरासाठी मिरच्या घेताना आता गृहिणींना विचार करावा लागणार आहे कारण बाजारपेठेत मिरचीची आवक घटल्याने किंमती वधारल्या आहेत. यंदा मिरचीचे भाव दुपटीने वाढले आहेत. डोंबिवलीच्या बाजारपेठेत लाल मिरच्यांना मोठी मागणी असून भाव वधारल्यामुळे ग्राहकांना हात आखडता घ्यावा लागत आहे.

परतीच्या पावसाचा फटका लाल मिरचीच्या उत्पादनाला बसला असून मिरचीचे भाव यंदा वाढलेले आहेत. भाजी, फळांबरोबर मिरचीच्या उत्पादनातही मोठी घट झाली असून लाल मिरची प्रचंड महाग झाली आहे. मिरचीची वाढती मागणी आणि कमी पुरवठा यामुळे मिरचीचे भाव वाढलेले आहेत. काही दिवसांपूर्वी झालेल्या परतीच्या पावसामुळे मिरचीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून नवीन पीक घेण्यास वेळ असल्याने मिरचीचे भाव हे अधिकच वाढण्याची शक्यता आहे.

साधारण मिरचीचा नवा हंगाम मार्च ते मे असा तीन महिन्यांचा असतो. त्यामध्ये सर्वात जास्त मिरचीचे उत्पादन हे महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, मध्य प्रदेश या राज्यांमध्ये होते. यंदा पाऊस लांबल्यामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. ऑक्टोबरमध्ये अति पावसामुळे मिरच्यांचे उत्पादन कमी झाले.

आंध्र प्रदेशात सर्वाधिक लाल मिरचीचे उत्पादन घेतले जाते. त्यानंतर कर्नाटक व मध्य प्रदेशात घेतले जाते. महाराष्ट्रातील खानदेशात लाल मिरचीचे उत्पादन घेतले जाते. तेलंगणात तिखट, तर कर्नाटकात कमी तिखटाच्या मिरचीचे उत्पादन घेतले जाते. कर्नाटकातून येणाऱ्या मिरचीला ४७ हजार ते ५२ हजार प्रतिक्विंटल भाव मिळत आहे; तर आंध्र प्रदेशातील मिरचीला ३० ते ३२ हजार रुपये भाव मिळत आहे.

**बेडगी मिरचीची चव आणि रंग हा उत्कृष्ट दर्जाचा असल्याने डोंबिवलीमध्ये बेडगी मिरचीची मागणी मोठ्या प्रमाणात आहे, तसेच गुंटूर मिरची आणि तेजा मिरची यांचीसुद्धा मोठी मागणी बाजारात आहे.**

**-भुवन सिंग, किराणाविक्रेता**

### बेडगी मिरचीही महागली

**बेडगी मिरचीसाठी तर ४७ हजारांहून अधिक रुपये क्विंटलमागे मोजावे लागत आहेत. दोन महिन्यांपूर्वी हेच मिरचीचे दर ३० हजार रुपयांवर होते. आता तेच ६० ते ७० हजार रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. त्यामुळे किरकोळ बाजारात मिरची तब्बल ५५० ते ६०० रुपये प्रतिकिलो दराने विकली जात आहे. मिरचीच्या जुन्या साठ्यातील चांगल्या प्रतीची मिरची संपली आहे. दुय्यम दर्जाची मिरची कमी प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामुळे मिरचीची भाववाढ झाली असून डिसेंबरपर्यंत मिरचीचे भाव असेच राहण्याची शक्यता असल्याचे विक्रेता आनंद पटेल यांनी सांगितले.**


### लाल तिखटदेखील महागणार

**अनेक गृहिणी या घरीच लाल तिखट तयार करतात. सुक्या मिरचीचा वापर भाज्यांसाठी किंवा इतर मसाल्यांसाठी केला जातो. आता मिरचीच्या किंमती वाढल्याने लाल तिखटाची किंमतही वाढणार आहे.**

# ज्येष्ठ साहित्यिक गजानन दर्णे यांचे निधन

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यातील केगाव येथील ज्येष्ठ साहित्यिक गजानन दर्णे यांचे शनिवारी (दि.१२) वयाच्या ९३व्या वर्षी निधन झाले. केगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे.



उरण-केगाव येथील ज्येष्ठ साहित्यिक गजानन दर्णे यांचा वयाच्या ९३व्या वर्षीही साहित्याचा प्रवास अखंडपणे सुरू होता. त्यांचा 'दोन एकर' जमीन हा शेवटचा कथासंग्रह प्रकाशित झाला होता. गजानन दर्णे यांचे १२ कथांचे हे प्रकाशित झालेले १६वे पुस्तक पुष्प होय. गेली ७३ वर्षांहून अधिक काळ ते सातत्याने लिखाण करीत आहेत. त्यांच्या 'कोळ्याचे जाळे' या कथेवर ज्येष्ठ व्यंगचित्रकार स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी ६२ वर्षांपूर्वी चितारले होते. त्यांची आतापर्यंत कुसुम गुच्छ, खोटी आदेली, चिमणे चंडोल, ज्येष्ठ पर्व, देवदूत, लाल्या, गणपतीच्या गोष्टी, कथा गणेशाच्या, कोळ्यांचे जाळे, महादेवाचा नंदी, चांदोबाची दिवाळी, हत्ती शाळेत जातो, दिक्षा, सुट्टीची कमाई, आणि डोंगर चालत आला, दोन एकर जमीन आदी १६ पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. त्यांच्या कथा, कवितांची संख्या बरीच मोठी आहे. ब्रेल लिपित (अंध भाषा) त्यांची सात पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. मागील ७२ वर्षांहून अधिक काळ ते सातत्याने लिखाण करीत आहेत. वयाच्या ९३व्या वर्षी ते विविध वर्तमान पत्रांसाठी लघुकथा व इतरत्रही लिखाण सुरूच होते.

आकाशवाणी मुंबई केंद्रानेही त्यांचे ३४ कार्यक्रम प्रसारित केले होते. त्यांच्या 'ज्येष्ठपर्व' या पुस्तकाला टाईम्स ऑफ इंडियाने त्यांना विशेष प्रसिद्धी दिली होती. पंचक्रोशीतल्या ३४ ज्येष्ठांची माहिती असलेल्या या पुस्तकाला 'डीएनए'ने वर्डस्मिथ (शब्दांचे सोनार) असे म्हटले आहे. अखिल भारतीय पत्रकार संघटनेने दामोदर नाट्यगृहात 'साहित्यरत्न' हा बहुमानाचा पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात आले होते. दर्णेना नाटकात काम करण्याची आवड होती. त्यांनी स्थानिक पातळीवर काही नाटकातही काम केले होते. क्रिकेटची आवड असलेल्या दर्णे यांनी उरण क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्ष पदही भूषविले आहे. राष्ट्र सेवादलाचे त्यांनी काम केले आहे. काही काळ ते उरण पूर्व साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. त्यांच्या निधनाने साहित्यिकांमधून हळहळ व्यक्त होत आहे.

# पनवेलमध्ये शासकीय योजनांचा महामेळावा

## समाजातील सर्व घटकांसाठी मार्गदर्शनपर उपक्रम



**पनवेल : वार्ताहर**

समाजाच्या सर्वच स्तरापर्यंत शासनाच्या विविध योजना पोहचणे गरजेचे आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल विधी सेवा समिती आणि पनवेल बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. १३) पनवेलच्या वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये विविध शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित केला असून तो सर्वांसाठी मार्गदर्शक ठरेल, असे मत मुख्य जिल्हा न्यायाधीश तथा रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष एस. एस. सावंत यांनी केले.

या कार्यक्रमास मुख्य जिल्हा न्यायाधीश एस. एस. सावंत यांच्यासह जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, रायगड जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख, पनवेल परिमंडळ २ पोलीस उपायुक्त पंकज डहाणे, रायगड जिल्हा सहकारी वकील भूषण साळवी, जिल्हा व सत्र न्यायधीश-१ रायगड अशोककुमार भिल्लारे, जिल्हा न्यायाधीश- १ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश पनवेल जयराज वडणे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव अमोल शिंदे, उपजिल्हाधिकारी सर्जेराव पाटील, पनवेल बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, प्रांताधिकारी राहुल मुंडके, तहसीलदार विजय तळेकर, जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, रवींद्र पाटील, ज्येष्ठ पत्रकार विजय कडू आदींसह इतर मान्यवर व मोठ्या प्रमाणात या योजनेचा लाभ व मार्गदर्शन घेण्यासाठी जिल्ह्यातून आलेले नागरिक व वकील उपस्थित होते.

या वेळी मुख्य जिल्हा न्यायाधीश सावंत यांनी सांगितले की, शासकीय योजनांची माहिती सर्वांपर्यंत पोहचल्याने त्याचा फायदा सर्वांनाच होतो. रायगड जिल्ह्यात अश्याप्रकारे मार्गदर्शन वेळोवेळी या योजनेद्वारे करण्यात येते. आजचा हा कार्यक्रम सुद्धा कौतुकास्पद आहे. त्यामुळे अनेकांना विविध योजनांचा लाभ मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. तर या वेळी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी सांगितले की, नागरिकांना लाभदायी ठरणाऱ्या १८ योजनांचे स्टॉल्स आज येथे उभारण्यात आलेले असून, ३१ ऑक्टोबरपासून सुरू असलेल्या या कार्यक्रमाची सांगता आज होत आहे.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून आम्ही तळागाळात पोहोचण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच यापुढील महामेळावा महाड येथे भरवण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले. या वेळी मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरूपामध्ये लाभार्थींना विविध शासकीय दाखले, धनादेश आदींचे वाटप करण्यात आले.

**सामान्य माणूस हा सुद्धा पोलीसच असतो. जनजागृत राहून त्यांनी पोलिसांना सहकार्य करावे. सर्वसामान्य नागरिकांसाठी पोलीस ठाण्यामध्ये सुद्धा मदत कक्ष व समुपदेशन आदी उपक्रम राबवले जातात. आजच्या तरुण पिढीला गुन्हेगारी व व्यसनमुक्त करण्यासाठी आमचा विशेष प्रयत्न असेल.**

**-सोमनाथ घार्गे, पोलीस अधिक्षक, रायगड जिल्हा**

**पनवेल विधी सेवा समितीच्या वतीने सर्वांना न्याय मागण्याचा अधिकार प्राप्त व्हावा, या उदात्त हेतूने तळोजा कारागृहात जाऊन तब्बल २८७५ कैद्यांची एका प्रश्नावलीद्वारे मुलाखती घेऊन त्यांना कायदेविषयक मार्गदर्शन केले.**

**-ॲड. मनोज भुजबळ, अध्यक्ष, पनवेल बार असोसिएशन**

**पनवेल विधी सेवा समितीने आदिवासी बांधवांच्या २५ प्रमुख व्यक्तींना कायदेविषयक मार्गदर्शन केले, तसेच त्यांच्या न्याय हक्कांचे बाबत त्यांना जागृत केले व त्यांच्या साठी विशेषत्वाने असलेल्या कायद्यांची त्यांना जाणीव करून दिली. मला खात्री आहे की, हे २५ आदिवासी बांधव किमान अडीच हजार आदिवासींपर्यंत हे ज्ञान पोहचवून त्यांच्या अधिकारांची त्यांना जाणीव करून देतील.**

**-जयराज वडणे, जिल्हा न्यायाधीश १ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश**



**पनवेल : तळोजा मजकूर ते श्रीक्षेत्र आळंदीपर्यंत श्री सद्गुरू वामनबाबा महाराजांची पायी दिंडी २९ वर्षांपासून काढण्यात येते. यंदाही दिंडी निघाली. या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी पालखीचे भोई होत शुभेच्छा दिल्या. सोबत जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, माजी नगरसेवक हरेश केणी, संतोष भोईर, संतोष पाटील, नितेश पाटील व अन्य.**

## कामोठ्यात सव्वा पाच लाखांची घरफोडी

**पनवेल :** एका घरात अज्ञात चोरट्याने केलेल्या घरफोडीत लाखो रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याची घटना कामोठे वसाहतीमध्ये घडली आहे. दिलीप कदम कामोठे सेक्टर ७ येथील गणेश कृपा सोसायटी येथे त्यांचा भाजीपाल्याचा व्यवसाय आहे. त्यांच्या घरात अज्ञात चोरट्याने शिरून घरात असलेले जवळपास पाच लाख २५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम लॉकर तोडून चोरी केले आहे. याबाबतची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## ट्रेलरच्या धडकेने एकाचा मृत्यू

**पनवेल :** ट्रेलरच्या धडकेने एका अज्ञात व्यक्तीचा गंभीररीत्या जखमी होऊन मृत्यू झाल्याची घटना पनवेल जवळील जेएनपीटी लेनवर कान्होबा धाब्यासमोर घडली आहे. या ठिकाणावरून एक ३० ते ३५ वयोगटातील व्यक्ती चालला असताना भरधाव वेगातील ट्रेलरची त्याला ठोकर बसली. झालेल्या अपघातात या व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. अपघाताची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# राम रतन आशियाना बीच रिसॉर्टचे आमदार महेश बालदींच्या हस्ते उद्घाटन



**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील नागाव येथील अंबिका वाडी स्वामी जीवनमुक्त स्वामी महाराज मठ समोर निसर्गाच्या सानिध्यात असलेले राम रतन आशियाना बीच रिसॉर्टचे शानदार उद्घाटन शनिवारी (दि. १२) आमदार महेश बालदी यांच्या हस्ते करण्यात आले. रिसॉर्टचे मालक राम सहतिया यांनी आमदार महेश बालदी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

सहतिया बंधूंनी उरणवासीयांसाठी चांगले काम केले आहे. हाताला चव असेल तर कुठेही हॉटेल चालत हे राम रतन व्हेजने दाखवून दिले आहे. आपल्यात कर्तुत्व असेल तर काश्मीरला बर्फ विकता येतो. जेव्हा जेव्हा गरज पडेल तेव्हा आम्ही तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, असे आश्वासन देत आमदार महेश बालदी यांनी सहतिया बंधूंना शुभेच्छा दिल्या.

रिसॉर्टच्या उद्घाटन सोहळ्यास भाजप तालुका अध्यक्ष तथा नगरसेवक रवी भोईर, शहर अध्यक्ष तथा नगरसेवक कौशिक शाह, रिसॉर्टचे मालक राम सहतिया, रतन सहतिया, नगरसेवक राजेश ठाकूर, सांची राम सहतिया, मनोहर सहतिया, खुशी सहतिया, भव्यम सहतिया, रमेश सहतिया, महेंद्र सहतिया, चंदू सहतिया, मननशेठ पटेल, हितेश शाह, हस्तीमल मेहता, दिनेश ठक्कर, म्हातवली सरपंच रंजना चारुदत्त पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य चारुदत्त पाटील, उद्योजक सुनील पेडणेकर, अजित भिंडे, रायगड जिल्हा अल्पसंख्यांक अध्यक्ष जसिम गॅस, रवी कुलकर्णी, वैभव लवेकर, संदीप पानसरे, अभिषेख जैन, स्वप्नील माळी, उद्योजक भूपेन घरत, डॉ. सुरेश पाटील, किसन डांगी, रोशनलाल मेहता, भरत मूर्ती, सहतीया परिवार मित्र मंडळी आदी उपस्थित होते.

# कळंबोलीमध्ये बाळासाहेबांच्या शिवसेनेचे संपर्क कार्यालय सुरू



**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

कळंबोली सेक्टर ४, प्रभाग क्रमांक ८मध्ये शिवसेना कार्यालयाचे उद्घाटन शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख रामदास शेवाळे यांच्या हस्ते रविवारी (दि. १३) करण्यात आले. या वेळी ते म्हणाले की, बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या जनसंपर्क कार्यालयातून गोरगरीब, सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देण्याच्या अनुषंगाने कामे होणार आहेत. हे कार्यालय जनतेचे असून येथे येणारा कोणीही खाली हात जाणार नाही.

ते पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लोकहिताच्या दृष्टिकोनातून अनेक कामे गेल्या काही महिन्यांमध्ये केले आहेत. निर्बंध हटवल्यामुळे दहीहंडी, गणेशोत्सव, दीपावलीचा सण मोठा उत्साहात नागरिकांना साजरा करता आला. सर्वसामान्यांच्या हितासाठी शिंदे-फडणवीस सरकारने अनेक निर्णय घेतले. मुख्यमंत्री महोदयांची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

कळंबोलीत सुरू करण्यात आलेल्या जनसंपर्क कार्यालयामध्ये सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्याच्या अनुषंगाने प्रामाणिकपणे प्रयत्न केले जातील. रहिवाशांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्याची सोडवणूक केली जाईल, अशी ग्वाही या वेळी शेवाळे यांनी दिली.

कार्यालयाच्या शुभारंभावेळी शहर प्रमुख तुकाराम सरक यांनी संपर्कप्रमुख रामदास शेवाळे यांचे स्वागत केले. या कार्यक्रमाला भाजप भटके-विमुक्त सेलचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे उपस्थित होते. त्यांनी मित्र पक्षाच्या या जनसंपर्क कार्यालयाला शुभेच्छा दिल्या.







**कामोठे : महाराष्ट्रातील अग्रगण्य संगणक संस्था स्टार्स कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट ही तिसरी शाखा शंकर कराडे यांनी सेक्टर ७ येथे सुरू केली आहे. या शाखेचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी कराडे यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक विकास घरत, माजी नगरसेविका हेमलता गोवारी, भाजप युवा मोर्चा रायगड जिल्हा अध्यक्ष मयुरेश नेतकर, कामोठे उपाध्यक्ष तेजस जाधव, चिटणीस किरण जाधव आदी उपस्थित होते.**





**पनवेल : येथील बांधकाम व्यवसायिक राजू गुप्ते यांच्या मातोश्री कांता गुप्ते यांचे वयाच्या ९४व्या वर्षी निधन झाले. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी रविवारी प्रार्थनासभेचे आयोजन मिडल हौसिंग सोसायटी मैदानाच्या गणेश मंदिर हॉल येथे करण्यात आले. या वेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी श्रद्धांजली वाहिली. या वेळी माजी आमदार नितीन सरदेसाई, माजी नगरसेवक अनिल भगत, उद्योजक जे. एम. म्हात्रे, कामगार नेते महेंद्र घरत, सिने निर्मात्या कल्पना कोठारी, माजी पंचायत समिती सदस्य निलेश पाटील, उद्योजक संजय पोतदार, प्रशांत पोतदार, उल्लास झुंझारराव, किरण मनोरे आदी उपस्थित होते.**



**स्थानिक कलाकारांच्या सुप्त गुणांना वाव मिळाला पाहिजे. तसेच आगरी कराडी संस्कृतीचे जतन करण्यासाठी कामोठे महोत्सव भरवण्यात येतो. या महोत्सवात सांस्कृतिक, समाज प्रबोधनपर कार्यक्रमांना मिळालेल्या उदंड प्रतिसादामुळे कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळते.**

**-जय पावणेकर, आयोजक**

# कामोठे महोत्सवाची सांगता

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

गेल्या दहा दिवसांपासून कामोठे परिसरातील हजारो नागरिकांना सांस्कृतिक कार्यक्रमांसोबत, खाद्य संस्कृतीचा मनमुराद आस्वाद देणाऱ्या आगरी कराडी कामोठे महोत्सवाची रविवारी (ता.१३ ) दिमाखदार सांगता झाली. कै. बळीराम राघो पावणेकर सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय प्रस्तृत, झेंडा सामाजिक संस्थेकडून झालेल्या या महोत्सवाचे सकाळ माध्यम प्रायोजक होते.

४ नोव्हेंबरपासून सुरू झालेल्या या महोत्सवात नृत्य, गायन, कामोठे आयडॉल, मिस कामोठे, कामोठे महोत्सव श्री अशा विविध कार्यक्रमांची रेलचेल होती. या महोत्सवातील विजेत्या स्पर्धकांना आकर्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर चंद्रकांत महाराज खेळेकर यांच्या कीर्तनाने समाज प्रबोधन केले गेले होते. याच बरोबर दर्या सागराचा राजा, महाराष्ट्राची लोकधारा अशा सरस कार्यक्रमामुळे रसिकांचे मनोरंजन झाले होते. यावेळी विविध कलाविष्कार, सामाजिक विषयावरील चर्चांनी महोत्सवाची शान वाढवली आहे. तर राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर या मान्यवरांनी महोत्सवाला भेट दिली होती.

### नियोजनबद्ध आयोजन

**झेंडा सामाजिक संस्थेचे ॲड. जय पावणेकर, अशोक पावणेकर, अमित धुतुकडे, विशाल बेलेकर, अनिल हावळे, मंगेश भोसले, सुमीत गोवारी, मोहन मुकादम, योगेश चिली, तकदीर पावणेकर यांनी महोत्सवाचे नियोजनबद्ध आयोजन केले.**

# रसायनीत पायी आळंदी दिंडीचे स्वागत

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील वारकरी संप्रदायातील नागरिकांकडून आळंदी येथे पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. ही दिंडी शनिवारी (दि. १२) निघाल्यानंतर दुपारी रसायनी पोलीस ठाण्याच्या आवारात पोहचली. या वेळी रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अश्वनाथ बप्पाजी खेडकर यांनी दर्शन घेऊन दिंडीचे स्वागत केले.

या वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक खेडकर यांनी दिंडीतील वारकरी संप्रदायासह नागरिकांना पायी आळंदीकडे जात असताना सुरक्षित अंतर ठेवून चालावे, रस्त्याबाजूने चालताना काळजी घ्यावी, असे सांगून पाताळगंगा येथील चावणे, कासप, जांभिवली, कराडे बुद्रुक व आसपासच्या गावातील निघालेल्या पायी दिंडीचे स्वागत केले. वारकरी संप्रदायाच्या वतीनेही वरिष्ठ पोलीस निरीक्षक खेडकर यांचा श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.



या वेळी रसायनी पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या पायी दिंडीत पाताळगंगा अतिरीक्त एमआयडीसी भागातील वारकऱ्यांसह लहानथोर सहभागी झाले होते. महिलांनी डोक्यावर तुळशी वृंदावन घेतले होते. यानंतर टाळ मृदुंगाच्या आवाजात हरिनामाच्या गजरात ही पायी दिंडी आळंदीकडे रवाना झाली.

## संपादकीय

# ‘मविआ’च्या उलट्या बोंबा!

आपल्या मराठीत एक म्हण आहे ती म्हणजे स्वतः गुन्हा करायचा आणि दोष दुसऱ्याला द्यायचा. राज्यातील महाविकास आघाडीचे पुढारी सध्या राज्याबाहेर जात असलेल्या प्रकल्पांबाबत विद्यमान सरकारला दोष देऊन अशाच बोंबा मारत आहेत. खरंतर प्रकल्प बाहेर जाण्यास पूर्वी सत्तेत असलेले व आताचे विरोधकच जबाबदार आहेत. तरीही ते आपले अपयश झाकण्यासाठी दुसऱ्याकडे बोट दाखवतात तेव्हा हसावे की रडावे हेच कळत नाही.

**राज्यातील महाविकास आघाडीचे सरकार जाऊन शिंदे-फडणवीस सरकार आता स्थिरस्थावर होऊ लागले आहे. मागील सरकारच्या काळातील विकासाचा बॅकलॉग भरून काढण्यासाठी नव्या सरकारने वेगाने पावले उचलली. त्यामुळे रखडलेले प्रश्न मार्गी लागू लागले आहेत. दुसरीकडे सरकार अस्तित्त्वात आल्यानंतर मंत्रिमंडळ विस्तार कधी होणार, विस्तार झाल्यानंतर जिल्ह्यांना पालकमंत्री केव्हा मिळणार आणि पालकमंत्री निश्चित झाल्यानंतर आता राज्यमंत्र्यांची नियुक्ती कधी होणार ही विरोधकांची प्रश्नावली न संपणारी आहे. विरोधकांचे ते कामच असते, असे मानले तरी त्यांच्याच मागील सरकारच्या काळात विकासाला ब्रेक लागला होता. शिवाय विविध समाजांचे आरक्षण, भरती प्रक्रिया, शेतकऱ्यांच्या समस्या असे अनेक प्रश्न ‘आ’ वासून उभ्या होत्या, मात्र ही मंडळी तेव्हा सत्तेच्या धुंदीत होती आणि त्यांना जनतेचे सोयरसुतक नव्हते. मुळात शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस या सरकारमधील घटक पक्षांमध्येच आलबेल नव्हते. त्याचा परिणाम विविध प्रकल्प राज्याबाहेर जाण्यात झाला. सत्तापालटानंतर मात्र आता हे प्रकल्प बाहेर जाण्यास कारणीभूत असणारे तत्कालीन सत्ताधारी आणि आताचे विरोधक विद्यमान सरकारवर त्याचे खापर फोडत आहेत. वेदांता-फॉक्सकॉन, टाटा एअरबस, सॅफ्रॉन असो की आताचा ऊर्जा उपकरण निर्मिती प्रकल्प हे सर्व एका रात्रीत इतर राज्यांत गेलेले नाही. कोणत्याही प्रकल्पाची प्रक्रिया आधीपासूनच सुरू असते. जागेची निवड, प्रस्ताव, बोलणी, पाहणी यांसारखे अनेक टप्पे आहेत, ज्यातून पुढे जाऊन प्रकल्प उभा राहत असतो. अनेक प्रकल्पांसंदर्भात आधीच्या सरकारला प्रस्ताव आले होते, मात्र ते नीट हाताळले न गेल्याने कंपन्या, उद्योजकांनी ते इतरत्र हलविले हे वास्तव लक्षात घेतले पाहिजे. प्रत्यक्ष फिल्डवर जाऊन काम करणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अभ्यासू व सक्रिय उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याची विस्कटलेली घडी पुन्हा बसविण्यासाठी काम सुरू केले आहे. केंद्र सरकारशी समन्वय साधून राज्य सरकार कार्यरत आहे. त्याचा परिपाक म्हणून दोन हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आणि पाच हजारांहून अधिक रोजगार असलेला इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर महाराष्ट्रात उभारण्यास केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. हे क्लस्टर पुणे जिल्ह्यातील रांजणगाव एमआयडीसीत साकारले जाणार आहे, तर नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रासाठी दोन लाख कोटींचे २२५ प्रकल्प मंजूर केले आहेत. या प्रकल्पांवर काम सुरू आहे किंवा होत आहे. यात रेल्वेसाठी ७५ हजार कोटी आणि रस्ते विकास प्रकल्पासाठी ५० हजार कोटींचा निधी देण्यात आलेला आहे. या विविध प्रकल्पांमुळे राज्यात गुंतवणूक होणार असून तरुण-तरुणींना रोजगार मिळणारही आहे. हे सर्व माहीत असल्याने विरोधक कोल्हेकुई करीत आहेत, मात्र त्यामुळे शिंदे-फडणवीस सरकार आणि महाराष्ट्राचा विकास व भरभराट होणे थांबणार नाही.**

# रस्ते कामांमधील त्रुटींमुळे अपघातास आमंत्रण

**खबरबात**
**विजय मांडे**

कर्जतमध्ये मागील सरकारच्या काळात नागरी विकासकामांमध्ये अनेक त्रुटी राहिल्या आहेत. त्यामुळे येथील जनतेला आज अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. राष्ट्रीय मार्गापासून राज्य, जिल्हा, ग्रामीण मार्गावर डांबरी किंवा सिमेंट काँक्रीटचे काही रस्ते झाले, मात्र या रस्त्यांच्या साईड पट्ट्या कित्येक महिने होत नसल्याने अपघात होत असतात. तसेच रस्त्यांवर गतिरोधक असतात, मात्र त्यावर पांढरे पट्टे नसल्याने अपघात होतात आणि अपघातामध्ये नाहक जीव जातात. हे रोखण्यासाठी साईडपट्ट्या झाल्याशिवाय आणि गतिरोधकांवर पट्टे मारल्याशिवाय ठेकेदाराला रस्त्याचे पूर्ण बिल अदा करू नये. तरच रस्ते, साईडपट्ट्या आणि गतिरोधकांवरील पट्टे मारण्याचे काम पूर्ण होऊन सुरक्षित प्रवास होईल.



तालुक्यातील बहुतांश रस्त्यांचे डांबरीकरण किंवा काँक्रीटीकरण झाले आहे. कर्जतच्या आदिवासी भागातही बऱ्या पैकी रस्ते झाले आहेत. हाताच्या बोटावर मोजता येईल इतक्याच रस्त्यांचे डांबरीकरण राहिले असावे. आपल्या कडील पावसामुळे काही रस्ते खड्डेमय झाले आहेत हे नाकारता येत नाही. रस्त्याचे काम पूर्ण होत आले तरी त्या रस्त्यांच्या कडेच्या साईड पट्ट्या होण्यास खूप वेळ लागतो. त्यामुळे ग्रामीण भागातील अरुंद रस्त्यावरून एखादी ट्रक किंवा बस आली की त्यातील एकाला रुंद रस्ता असेल तेथे थांबावे लागते. कधी कधी या बाबतीत तू तू मै मै सुद्धा होते आणि त्यातील एखादा स्थानिक वाहन चालक असला की भांडणे होऊन हाणामाऱ्या सुद्धा झाल्या आहेत.

ग्रामीण भागातील रस्ते अरुंद असतात. साईड पट्ट्या नसल्याने पावसाळ्यात रस्त्याच्या कडेला गवत वाढलेले असते. त्यामुळे समोरासमोर वाहने आली की रस्त्याचा अंदाज येत नाही आणि मग अपघात होऊ शकतो. खरे तर साईड पट्ट्या वेळेवर झाल्यास त्यावर गवत येणार नाही आणि वाहनचालकांना आपले वाहन सुरक्षितपणे चालवता येईल. ग्रामीण भागात एक एका गावात आठ दहा गतिरोधक असतात मात्र त्यावर पट्टे नसल्याने अचानक ब्रेक दाबल्याने मोटरसायकल घसरून अपघात होतो. तसेच एकदा रस्ते झाले की, त्याची गुणवत्ता काय? हे तपासणेही गरजेची असते. काही रस्ते तर पहिला पावसाळाही बघत नाहीत. मग आपल्याकडे पाऊसच भरपूर म्हणून ही अवस्था होते. असे कारण पुढे करायचे. या रस्त्यांची काही महिन्यांनी दुरवस्था होते. त्यावर खड्डे पडतात आणि मग अपघात होतात.



त्यातही अनेकांचे जीव गेलेले आहेत. काही रस्ते खराब झाल्यावर त्याची किती तरी वर्षे दुरुस्ती होत नाही. त्यामुळे हा रस्ता झाला होता की नव्हता? असा प्रश्न पडतो. रस्ते करतानाच ठेकेदाराकडून गॅरंटी घ्यायला हवी मग थोडा जास्त खर्च झाला तरी चालेल, परंतु तसे होत नाही.

काही रस्त्यांवर गतिरोधक नसावेत असे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आहेत, मात्र रस्त्यावर असलेल्या गावांतील ग्रामस्थांच्या मागणीमुळे अशा रस्त्यांवर सुद्धा गतिरोधक तयार केले आहेत.

गतिरोधक तयार करण्याचे काही नियम आहेत. तो किती रुंद असावा? किती उंच असावा? काही ठिकाणी नियमानुसार गतिरोधक आहेत, मात्र बहुतांश रस्त्यांवर हे नियम बासनात गुंढाळून गतिरोधक तयार केले आहेत. काही ठिकाणी गतिरोधक अगदी अरुंद मात्र उंचीला जास्त असल्याने आणि त्यावर पांढरे पट्टे नसल्याने मोटरसायकलस्वारांचे अनेक अपघात झाले आहेत. त्यामध्ये विशेष म्हणजे मागे बसलेल्या महिला पडून मृत्युमुखी पडल्या आहेत तर कित्येक जणी कायमच्या अपंग झाल्या आहेत.

शहराच्या ठिकाणी काँक्रीटचे रस्ते करताना एका बाजूचा रस्ता पूर्ण केला जातो मात्र मधे-मधे जलवाहिन्या किंवा विजेच्या वाहिन्या जाण्यासाठी सोडलेल्या रस्त्यांवर कित्येक महिने पेव्हर ब्लॉक बसविले जात नाहीत; शिवाय साईडपट्टी तयार केली जात नाही.

त्यामुळे अनेक भागातील एसटी बसच्या सुविधा अनेक महिने बंद झाल्याची उदाहरणे तालुक्यात आहेत. काही मुख्य रस्त्यांचे काँक्रीटीकरण करताना एका बाजूच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण पूर्ण होते, मात्र दुसरी बाजू होण्यास वर्ष-सहा महिन्यांचा कालावधी लोटतो. तो कुठेतरी थांबला पाहिजे. या कारणाने वाहनचालकांना द्राविडी प्राणायम करावा लागतो त्यामुळे वेळ व पैसाही वाया जातो. हे कुठे तरी थांबले पाहिजे.

रस्त्याच्या निविदा काढताना साईड पट्टी, गतिरोधक या साऱ्या बाबी त्यामध्ये असतीलही परंतु ते वेळेवर पूर्ण झाले की, नाही हे पाहण्याची जबाबदारी संबंधित प्रशासनाची आहे, मात्र त्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

## बदलते तंत्रज्ञान

# अरे व्वा! इंटरनेटशिवायही करू शकता युपीआय पेमेंट

इंटरनेटशिवायही तुम्ही युनिफाइड पेमेंट इंटरफेस म्हणजेच UPI सुविधा वापरू शकता. तुम्ही तुमचं मोबाईल बिल इंटरनेट कनेक्शनशिवाय UPI द्वारेदेखील भरू शकता. 123PAY UPI सेवेच्या मदतीने तुम्ही हे करू शकता. घरबसल्या अवघ्या काही मिनिटांत झटपट बिल भरू शकता.



नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशनने (NPCI) अलीकडेच जाहीर केलं आहे की 123PAY वीज बिल भरणा सेवा आता ७० पेक्षा जास्त वीज मंडळांसाठी उपलब्ध असेल. 123PAY सेवा आणि भारत बिल पेमेंट सिस्टम (BBPS) वापरून, ग्राहक त्यांचे वीज बिल जलद आणि सहज भरू शकतील. वीज बिल थेट बँक खात्यातून भरता येतं.

**’या’ स्टेप्स करा फॉलो**

NPCI च्या प्रेस रिलीझनुसार, वीज बिल भरणा 123PAYच्या माध्यमातून केला जाऊ शकतो. यासाठी तुम्हाला काही स्टेप्स फॉलो कराव्या लागतील. वीज बिल भरण्यासाठी ०८०-४५१६-३६६६ किंवा ६३६६ २०० २०० या क्रमांकांवर कॉल करा.

युजरला वीज बिल भरण्याचा पर्याय निवडावा लागेल. त्यानंतर युजरला ज्या वीज मंडळाला पेमेंट करायचे आहे त्याचे नाव घ्यावे लागेल. युजरला कॉलवर विचारलेला ग्राहक क्रमांक आणि इतर तपशील प्रविष्ट करावे लागतील. त्यानंतर बिलाच्या थकबाकीची माहिती मिळेल.

पेमेंटसाठी युजरला आता UPI पिन टाकावा लागेल. ’०८० ४५१६ ३६६६’ किंवा ’६३६६ २०० २००’ पेमेंट नंबरवर कॉल करून त्यांचे वीज बिल भरण्यास सक्षम असतील. या फोनवर लोक १० प्रादेशिक भाषांमध्ये बोलू शकतात.


**123PAY UPI सेवा काय आहे?**

नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (NPCI) ने फीचर फोनसाठी 123PAY UPI सेवा तयार केली आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (RBI) या वर्षाच्या सुरुवातीला ही सेवा सुरू केली होती. 123PAY सेवेच्या मदतीनं फीचर फोन वापरणारे डिजिटल व्यवहार करू शकतात.

यामध्ये फोन, मिस्ड कॉल ऑन इंटरएक्टिव्ह व्हॉईस रिस्पॉन्सच्या माध्यमातून ध्वनी आधारित प्रणालीची मदत घेता येईल. UPI पिन हा ४ ते ६ अंकी कोड असतो, जो तुम्ही मोबाईल ॲप किंवा खतठ किंवा इतर कोणत्याही चॅनेलवर पहिल्यांदा नोंदणी करताना तयार करता. एका हिंदी वेबसाईटने याबाबतचे वृत्त दिले आहे.

# गोड आजाराचा विळखा; जागतिक मधुमेह दिन

**निमित्त**



मधुमेह ही व्याधी आज सर्वांच्या परिचयाची झाली असून या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. विशेष असे, ६०व्या वर्षांच्या सरासरी आयुर्मानात पडणाऱ्या या आजाराचा विळखा आता तिशीतच पडू लागला आहे. मधुमेहाचे प्रमाण वाढते असल्याने १० लाख व्यक्तींची मधुमेह चाचणी एका दिवसात करण्यात आली. यात ९ टक्के लोकं गोड आजाराच्या विळख्यात अडकले असून त्यांना याची माहितीच नसल्याचे चाचणीतून उघड झाले. एका दिवसाच्या तपासणी मोहिमेतून ९६ हजार व्यक्तींना मधुमेह असल्याचे निदान झाले. जिल्ह्यात सुमारे तीन लाखावर मधुमेही असण्याची शक्यता वर्तविली आहे.

‘रिसर्च सोसायटी फार स्टडी ऑफ डायबेटिज इन इंडिया’ या संस्थेतर्फे २९ सप्टेंबर २०२१ रोजी मधुमेह जागरूकता चळवळीतून या गोड आजाराचा संदेश देण्यासाठी एका दिवसात देशात १० लाख ७० हजार व्यक्तींची तपासणी झाली. यांना मधुमेह आहे की, नाही याची माहिती नव्हती. अलीकडे वैद्यकीय मार्गदर्शनाचा अभाव, मधुमेहाचे व्यवस्थापन करण्याकडे केलेले दुर्लक्ष यामुळे अवघ्या २५ ते ३५ वर्षे वयोगटातील युवापिढी तसेच ‘टाइप-१’ या मधुमेहाच्या व्याधीत किशोरवयीन आणि लहान मुले सापडलेली आहेत. मुलांच्या वाढत्या लठ्ठपणामुळे झपाट्याने वाढ होत आहे. ‘लठ्ठपणा’, ‘बदलती जीवनशैली’ आणि ‘आनुवंशिकता’ या तीन कारणांमुळेच मधुमेह दिवसेंदिवस वाढत आहे. पुरुषांच्या तुलनेत मधुमेहींमध्ये महिलांची संख्या अधिकतर आहे. बदलत्या काळात मधुमेहाचा धोका दुपटीने वाढला आहे.

**अंधत्वाचा धोका : डॉ. कविता धाबर्डे**

मधुमेहामुळे डोळे जाण्याची भीती असते. डोळ्यांपुढे काहीतरी तरंगल्यासारखे वाटते. काळे ठिपके दिसतात. दृष्टिपटलाची बाधा होऊन नजर कमी होते. आतील द्रवामधील रक्तस्रावामुळे दृष्टिपटल सरकल्यासारखे वाटते. रंग ओळखण्यात अडचण निर्माण होते. वारंवार चष्म्याचा नंबर बदलतो. मधुमेही व्यक्तीमध्ये मोतीबिंदू तरुण वयात होतो. एकाच वस्तूच्या दोन प्रतिमा दिसतात. काचबिंदू होतो. यामुळे दृष्टिपटलाची वारंवार तपासणी करून घ्यावी, आहारात डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार बदल करून घ्यावे, असे मेडिकलच्या नेत्ररोग विभागाच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. कविता धाबर्डे म्हणाल्या. मुलांमधील खिलाडूवृत्ती कमी झाली. खुर्चीत बसून हाती रिमोट घेत त्याची नजर टीव्हीच्या स्क्रीनवर असते. डोळ्यांच्या आजारासोबत लठ्ठपणा वाढतो. आणि त्याच्या सोबतीला जणू खेळण्यासाठीच मधुमेह येतो. यावर नियंत्रणासाठी कमी खा, जास्त चाला. चांगली झोप घ्या.

**-डॉ. सुनील गुप्ता,**
**मधुमेहतज्ज्ञ, नागपूर**

**क्लिक...क्लिक...!**



**सांगली : माणदेशवरून आलेले हे मेंढपाळ सध्या विटा परिसरात दाखल झाले आहेत. ते आपल्या मेंढ्या शेतात लेंडीखतासाठी बसवितात आणि त्या बदल्यात शेतकऱ्यांकडून मेंढपाळांना पैसे किंवा धान्य दिले जाते.** (छाया : शशिकांत बारसिंग)

## आरोग्य प्रहर

# मधुमेह ठरतो हृदयविकाराला कारणीभूत; ‘अशी’ घ्या काळजी

टाईप-२ मधुमेह झालेल्या रुग्णांमध्ये हार्ट फेल झाल्याची प्रकरणे अधिक दिसून येतात, असे कार्डिओव्हॅस्क्युलर डायबेटोलॉजी जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासात नमूद करण्यात आले आहे.



संसर्गजन्य आजारांनंतर हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आजारामुळे जगभरात सर्वाधिक मृत्यू होतात. त्यापैकी हार्ट टॅकच्या केसेसमध्ये लक्षणीय वाढ होताना दिसत आहे. कोरोना महामारीपासून हार्ट टॅक आणि कार्डिक अरेस्टमुळे मृत्यू होणाऱ्यांच्या संख्येतही झपाट्याने वाढ झाली आहे. अनेक लोक लहान वयातच हृदयविकाराच्या झटक्याने जीव गमावत आहेत. हृदयविकाराचे एक प्रमुख कारण म्हणजे मधुमेहासारखी समस्याही आहे, त्यावर वेळीच नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे.

तज्ज्ञांच्या सांगण्यानुसार, खराब जीवनशैली आणि खाण्या-पिण्याच्या चुकीच्या सवयी यामुळे मधुमेहाच्या रुग्णांमध्ये वाढ होत आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, २०२१ साली जगभरात १८ ते ८० वयोगटातील ५४ कोटी लोकांना मधुमेह आहे. आता कमी वयात मधुमेहाचे रुग्ण वाढत आहेत, ही चिंतेची बाब आहे. या आजारामुळे थेट हृदयरोगाचा धोका वाढतो.

मधुमेहामुळे कोरोनरी आर्टरीचे होते नुकसान - द लॅन्सेट या मेडिकल जर्नलमध्ये २०१६ साली प्रकाशित झालेल्या अभ्यासामध्ये असे नमूद करण्यात आल आहे की, ज्या लोकांना मधुमेह आहे त्यांना हृदयरोगाचा धोका २० टक्के जास्त असतो. रक्तातील साखर वाढल्यामुळे रक्तवाहिन्यांचे नुकसान होते, व हृदयाच्या कार्यावर परिणाम होतो. ज्यामुळे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोगाचा धोका वाढतो. दरवर्षी अशी काही प्रकरणे समोर येत आहेत ज्यामध्ये मधुमेहामुळे कोरोनरी आर्टरी आणि पेरिफेरल आर्टरीचे नुकसान झाल्याचे दिसून आले आहे. ज्या लोकांना मधुमेहाचा त्रास आहे, त्यांना हृदयरोगापासून बचाव करण्याचा सल्ला दिला जातो.

टाइप-२ मधुमेह असलेल्या व्यक्तींना अधिक धोका - टाईप-२ मधुमेह झालेल्या रुग्णांमध्ये हार्ट फेल झाल्याची प्रकरणे अधिक दिसून येतात, असे कार्डिओव्हॅस्क्युलर डायबेटोलॉजी जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासात नमूद करण्यात आले आहे. ज्या रुग्णांना दीर्घकाळापासून मधुमेह आहे, त्यांच्यामध्ये हार्ट फेल होण्याचा धोका ३० ते ४० टक्के असतो. अशा रुग्णांना विशेष खबरदारी घेण्याचा सल्ला दिला जातो.

# मुंबई-पुणे महामार्ग आणखी सुसाट

## विस्तारीकरणाचे काम ९० टक्के पूर्ण

**खोपोली : रामप्रहर वृत्त**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गांवरील बोरघाट अपघाताचे स्थळ झाले आहे. उतरते आणि वळणदार रस्ते असल्याने अपघात होऊन मृत्यूची संख्या वाढत आहे, मात्र आता बोरघाटाला पर्याय म्हणून मिसिंग लिंकची उभारणी सुरू असल्याने त्यालाच जोड म्हणून जुन्याच मुंबई -पुणे द्रुतगती महामार्ग सहापदरीचे विस्तारीत करून आठपदरी करण्यात येत आहे. त्यासोबतच टोल नाक्यांवर वाहतूक कोंडी टाळण्यासाठी दोन्ही मार्गांवर प्रत्येकी १७ टोल बुथची उभारणी केली जाणार असल्याने वाहतुकदारांना दिलासा मिळणार आहे.



खालापूर टोलनाका ते खोपोली महामार्गावरील सहापदरी रस्त्याचे आठपदरी विस्तारीकरणाचे काम सुमारे ९० टक्के पूर्ण झाले असल्याचे महाराष्ट्र राज्य रस्ते विकाम महामंडळाने सांगितले आहे. या मार्गावर वळणदार आणि चढ-उतार असलेल्या बोरघाटात अवजड वाहनांमूळे होणारी वाहतूक कोंडी टाळता येणार आहे.

पुणे किंवा मुंबई जाणाऱ्यांना मिसींग लिंकचा वापर करता येणार असल्याने कमी वेळात पुणे-मुंबई गाठता येणार आहे.

**टोलनाके विस्तारीकरणाचे कामही झाले वेगाने सुरू**

***खालापूर टोलनाका ते खोपोली इंटरचेंज या अस्तित्वातील यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गाचे आठपदरीकरणाचे ५.८६ किमीचे काम बहुतांश पूर्ण झाले आहे. यादरम्यान लांबीमध्ये तीन मोठे पूल, लहान पूल, पाईपकल्व्हर्ट, बॉक्सकल्व्हर्ट अंतर्भूत असून सद्यस्थितीत ९० टक्केपेक्षा जास्त पूर्ण झाले असल्याचे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सांगितले असून, खालापूर व उर्से या दोन्ही ठिकाणी पथकरनाक्यांचे विस्तारीकरणसुद्धा केले जाणार आहे.***

# कर्जतच्या लोकन्यायालयात ४५२ प्रकरणे निकाली

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत येथील दिवाणी न्यायालयामध्ये लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते. या लोकन्यायालयामध्ये तडजोडीसाठी एकूण दिवाणी व फौजदारी २१९ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ३६ प्रकरणे निकाली निघाली, तसेच वाद पूर्वप्रकरणे ४,२२२ ठेवण्यात आली होती. त्यापैकी ४१६ प्रकरणे निकाली निघाली. वादपूर्व प्रकरणांमध्ये तडजोडीपोटी एकूण १४ लाख ४८ हजार ५६५ रुपये वसूली झाली.



या लोकन्यायालयाचे कामकाज कर्जत तालुका निधी सेवा समिती अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश एस. आर. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. पॅनल ॲडव्होकेट म्हणून ज्येष्ठ वकील राजेंद्र निगुडकर यांनी काम पाहिले. पॅनलला विशेष सहकार्य कर्जत बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अरुण नायक तसेच इतर सर्व सदस्यांचे सहकार्य लाभले. या वेळी ॲड. अजय मेडी, दीपक गायकवाड, सनी डीमेलो, मोतीलाल ओसवाल, प्रदीप सुर्वे, दीपक पादिर, समीर लाड, महेश घारे, मनोज क्षीरसागर, रविकर गायकवाड, निलेश पादिर, पूजा सुर्वे, हिना शेख, रुचिरा दगडे, हिना ओसवाल, वर्षा कोचुरे आदी उपस्थित होते.

# चौक येथे कायदेविषयक जनजागृती

**खोपोली : प्रतिनिधी**

तालुका विधी सेवा समिती खालापूरच्या वतीने सकल भारत कायदेविषयक जनजागृती अभियनाची सांगता चौक येथे करण्यात आली.

कार्यक्रमास खालापूर दिवाणी न्यायधीश आर. डी. बावके, पी. एम. माने, सहदिवाणी न्यायधीश जे. डी. पाटील, ॲड. मिलिंद सुरावकर यांनी मार्गदर्शन केले.



(छाया : विनायक मांडपे)

चौक सरपंच रितु ठोंबरे आणि भाजपचे तुपगावचे सरपंच रवि कुंभार यांनी मान्यवरांचा सत्कार केला. न्यायाधिशांनी कायदेविषयक माहिती सविस्तर सांगितली. तुपगाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच सुयोग भालेकर, सदस्य कांता नागावकर, आश्विनी मोरे, भाजप आरोग्य सेलच्या विजय ठोसर, पोलीस कर्मचारी सचिन व्हसकोटी, चौक ग्रामपंचायत सदस्य निखिल मालुसरे, नयना झिंगे, पुजा हातमोडे, रीना सोनट्टके, स्वाती देशमुख, वृषाली आबंवणे, राजीव पाटील, कर्मचारी उपस्थित होते.

# कर्जतमधील शिबिरात ९३ जणांचे रक्तदान

(छाया : विजय मांडे)

**कर्जत : प्रतिनिधी**

गीता जयंतीनिमित्ताने विश्व हिंदू परिषद-बजरंग दल, मातृ शक्ती, दुर्गा वाहिनी यांच्या संयुक्त विद्यमाने व घाटकोपरच्या समर्पण रक्तपेढीच्या सहकार्याने कर्जतमध्ये रक्तदान शिबिर श्री कपालेश्वर मंदिराच्या सभागृहात आयोजित केले होते. या शिबिरात ९३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी संयोजित केलेले ४६२वे शिबिर ठरले.

शिबिराचे उद्घाटन नगरसेविका स्वामिनी मांजरे यांच्या हस्ते झाले. सर्वप्रथम रोशन अगज आणि कौस्तुभ करमरकर यांनी रक्तदान करून शुभारंभ केला. समर्पण ब्लड सेंटरच्या डॉ. एम. ए. शेख यांच्या मार्गदर्शनाखाली स्नेहल कांबळे, लक्ष्मण नाईक, प्रदीप नितोरे, सोहन जाधव, अनिकेत जाधव, सूरज जाधव, राजेश विश्वकर्मा, विजय मोहिते यांनी रक्तसंकलन केले. या वेळी उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, राजाभाऊ कोठारी, सुनील गोगटे, दिनेश रणदिवे, गणेश ठोसर, बिनीता घुमरे, दीपक बेहेरे, दीपक गायकवाड



प्रसन्न खेडकर, कमलाकर किरडे, दया हजारे, सचिन ठाकूर, केदार भडगावकर, मयुरेश चौधरी, प्रतीक पाटील, अनंता हजारे, विनोद बडेकर, दीपक डवरी, अविनाश बैलमारे, रोहित चव्हाण, दिलीप कवाडकर, रोटरीचे अध्यक्ष सतीश श्रीखंडे, कुलाबा जिल्हा बजरंग संयोजक साईनाथ श्रीखंडे, कर्जत प्रखंड मंत्री विशाल जोशी, अध्यक्ष विनायक उपाध्ये आदी उपस्थित होते.

# भाल, वाशी ते आळंदी पायी दिंडी सोहळा

**पेण : प्रतिनिधी**

भाल विठ्ठलवाडी, वाशी ते आळंदी पायी वारीला रविवारी (दि. १३) सुरुवात झाली असून मंगळवारी (दि. २२)पर्यंत सांगता होणार आहे.

श्री ज्ञानेश्वरी वारकरी सांप्रदाय विकास मंडळ भाल वाशी विभाग यांच्या सौजन्याने तसेच वै. हभप देवळे गुरुजी, हभप शंकर तुकाराम पाटील वाशी यांच्या आशिर्वादाने तसेच हभप दत्तात्रयबुवा ओढांगीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही पायी दिंडी वाटचाल करीत आहे.

दिंडीत पहाटे ५ वाजता काकडा होईल. भजन तसेच संध्याकाळी सहा वाजता हरिपाठ, प्रवचन व रात्री नऊ वाजता कीर्तन असा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# जांभूळपाडा स्मशानभूमीत लाकडे उपलब्ध करण्याची मागणी

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील जांभूळपाडा गावातील स्मशानभूमीत सरणासाठी लाकूड उपलब्ध नाही. त्यामुळे मृतांच्या नातेवाईकांना लाकडासाठी वणवण करावी लागत आहे. त्यामुळे स्मशानभूमित लाकडे उपलब्ध करण्याची मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.



असाच प्रकार ४ नोव्हेंबर रोजी घडला. गावातील एका व्यक्तीची निधन झाल्यानंतर त्याच्या नातेवाईकांनी अंत्यविधीसाठी नेले असता तेथे लाकडे उपलब्ध नसल्यामुळे नातेवाईकांना लाकडासाठी वणवण करावे लागले. याबाबत तातडीने सर्व ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीत जाऊन ग्रामसेवकांची भेट घेऊन लवकरात लवकर याबाबत उपाययोजना करावी, अशी मागणी केली.

**ग्रामस्थांनी केलेल्या मागणीनुसार लाकडांची सोय लवकरच करण्यात येईल, मात्र उपलब्ध लाकडांचा योग्य प्रमाणात वापर करण्यात यावा.**

**-सचिन केंद्रे, ग्रामसेवक, व्हाड-जांभूळपाडा**

# कोर्लई ते एकविरा पालखीसह पदयात्रेस प्रारंभ

**रेवदंडा : वार्ताहर**

प्रतिवर्षाप्रमाणे कोर्लई ते एकविरा पालखीसह पदयात्रेचा प्रारंभ शनिवारी (दि. १२) उत्साहात झाला. या पालखीसह पदयात्रेचे नियोजन साईसेवक एकविरा मंडळ, कोर्लई यांनी केले आहे.

कोर्लई दत्तमंदिर येथून कोर्लई ते एकिविरा पालखीस पदयात्रेचा प्रारंभ सकाळी नऊ वाजता झाला, या वेळी कोर्लई ग्रामस्थ व महिला यांनी मोठ्या भक्तीभावाने पालखीचे दर्शन घेतले. ही पालखी बुधवारी (दि. १६) एकविरा येथे पोहचेल. या पालखीसह पदयात्रेचे नियोजन सायन-मुंबई शिवसेना शाखाप्रमुख, मुरूड तालुका शिवसेना संपर्क प्रमुख संस्थापक गजानन पाटील यांनी केले आहे. या पालखीसह पदयात्रेस साई सेवक एकविरा मंडळ अध्यक्ष अभय पाटील, उपाध्यक्ष मारूती पाटील, खजिनदार जितेंद्र पाटील, सहखजिनदार राजू आग्रावकर हे किशोर गजानन पाटील यांच्या सौजन्याने विशेष परिश्रम घेत आहेत, तसेच मनोहर कोटकर, संजय बळकवडे, संतोष बलकवडे, दयानंद कनगी, राजन बलकवडे, राजन पाटील,चंद्रकांत भाटे, अमोल पाटील, विवेक पाटील, महेश पाटील, विवेक बलकवडे, पवन भोईर, निलेश पाटील, वसंत सोडेकर, सोमनाथ भोबर, महेश पाटील, संदेश पैतरी, राजन पाटील, आदीचे सहकार्य मिळत आहे.

कोर्लई ते एकविरा पालखीसह पदयात्रेचे हे १४वे वर्ष आहे. कोर्लई दत्तमंदिर येथे शनिवारी (दि. १९) सांगता समारंभ आयोजित करण्यता आला असून यानिमित्त सायकांळी सहा वाजता महापुजा व महाप्रसाद तसेच ७ वाजता सांगता समारंभ व मान्यवरांचे सत्कार कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.





(छाया : महेंद्र खैरे)

# आजचे विद्यार्थी, उद्याचे भविष्य!





बालदिन विशेष

भारतात दरवर्षी १४ नोव्हेंबरला आपण बालदिन साजरा करतो. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म १४ नोव्हेंबर १८८९ रोजी अलाहाबाद येथे झाला. 'चाचा नेहरू' या नावाने प्रसिद्ध असलेले जवाहरलाल नेहरू यांना मुलांचे खूप प्रेम होते. देशातील मुले पूर्ण बालपण आणि उच्च शिक्षणास पात्र आहेत, असे ते नेहमी सांगत. चाचा नेहरूंच्या मुलांवरील अपार प्रेमामुळे, १९६४मध्ये नेहरूंच्या मृत्यूनंतर १४ नोव्हेंबर हा 'बालदिन' म्हणून घोषित करण्यात आला. हा दिवस मुलांबद्दल प्रेम आणि आपुलकीचा वर्षाव करण्यासाठी साजरा केला जातो. शाळा आणि महाविद्यालये बालदिन मोठ्या उत्साहात साजरा करतात.

मुले ही भविष्यातील मार्गदर्शक असतात. त्यामुळे प्रत्येक शाळा हा दिवस विविध प्रश्नमंजुषा, वादविवाद, नृत्य, संगीत, नाटक असे सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन साजरा करतात. शिक्षक विद्यार्थ्यांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करतात. चाचा नेहरूंचा नेहमीच असा विश्वास होता की, आजची मुले हेच उद्याचे भविष्य आहे आणि म्हणूनच शिक्षक अनेकदा नाटक किंवा नाटकाद्वारे मुलांना चांगल्या उद्याच्या देशासाठी परिपूर्ण बालपण घालवण्याचे महत्त्व सांगतात. पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले होते, आजची मुले उद्याचा भारत घडवतील. आपण त्यांना ज्या पद्धतीने वाढवतो ते देशाचे भवितव्य ठरवेल. चाचा नेहरूंचे प्रसिद्ध विचार लक्षात ठेवण्यासाठी आणि ते साजरे करण्याचा बालदिन हा एक सुंदर प्रसंग आहे. बालदिन साजरा करणे हा लहान मुले आणि प्रौढ दोघांनाही जाणीव करून देण्याचा एक उत्तम मार्ग आहे. मुले देशाचे खरे भविष्य असतात. त्यामुळे प्रत्येक मुलाला पूर्ण बालपण देण्याची जबाबदारी प्रत्येकाने समजून घेतली पाहिजे. आज आपण आपल्या मुलांना जे प्रेम आणि काळजी देतो, उद्या आपल्या देशाचा भाग्य उजळण्यात साथ मिळेल. बालदिन साजरा करताना हाच विचार मनात ठेवला पाहिजे.

अनेक शाळांमध्ये क्रीडा स्पर्धा आयोजित करून हा दिवस साजरा केला जातो. अनेक स्वयंसेवी संस्था हा दिवस वंचित मुलांना मदतीचा हात देण्याची संधी म्हणून साधतात. ते वंचित मुलांसाठी अनेक कार्यक्रमही आयोजित करतात. अनेकदा लोक पुस्तके, खाद्यपदार्थ, चॉकलेट्स, खेळणी आणि इतर आवश्यक वस्तू मुलांमध्ये वितरित करतात. याशिवाय ते अनाथाश्रमासाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करतात ज्यात मुले प्रश्नमंजुषा, नृत्य, संगीत, खेळ आदी कार्यक्रमात भाग घेतात. बक्षिसेही मुलांना वाटली जातात.

मुलांना त्यांच्या शिक्षण, आरोग्य आणि कल्याणासाठी सरकारने राबविलेल्या किंवा जाहीर केलेल्या विविध योजनांची जाणीव करून देण्यासाठी विविध जनजागृती सत्रांचे आयोजन केले जाते.

(साभार : वेबदुनिया)

# संभाजीराजेंचा आज पेणमध्ये दौरा

**पेण : प्रतिनिधी**

शिवराज्य प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य यांच्या प्रथम राज्यस्तरीय वर्धापनदिनाचे औचित्य साधून जावळी येथील बाळगंगा नदीकाठीवरील भव्य मैदानावर कार्यक्रमाचे आयोजन आज करण्यात आले आहे. या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून युवराज छत्रपती संभाजी महाराज यांची उपस्थिती लाभणार आहे.

या वेळी महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन, मान्यवरांचे स्वागत, सभेचे उद्घाटन, तसेच युवराज छत्रपती संभाजी महाराज यांचे प्रमुख मार्गदर्शन असणार आहे आणि अनाथ मुलांना शैक्षणिक सहाय्य आर्थिक निधी, राज्यस्तरीय गौरव पुरस्कार वितरण सोहळा असे कार्यक्रम आयोजित केले आले असून विविध मान्वरांची उपस्थिती लाभणार आहे.

सर्व नागरिकांनी या कार्यक्रमासाठी उपस्थित रहावे असे आवाहन शिवराज्य प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष रोशन पाटील आणि प्रवक्ते विकी कदम यांनी केले आहे.


## पेण नगर परिषद, पेण

### जाहीर निविदा सूचना सन २०२२-२३

पेण नगर परिषद, पेण, जि. रायगड यांजकडून खालील कामांसाठी राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागात योग्य त्या वर्गात नोंदविलेल्या अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून टक्केवारी दराच्या सिलबंद निविदा द्विनोंद लिफाफा पद्धतीने मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. | कामाची इसारा रक्कम रु. | निविदा फॉर्म फी रक्कम रु. | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पेण नगरपरिषद हद्दीतील कुंभार आळी येथील माऊली हॉस्फिटल जवळील ड्रेनेजचे काम करणे. | ११५४९६/- | २०००/- | ५००/- | १८० दिवस |

**-: कामाच्या अटी व शर्ती :-**

०१. निविदा फॉर्मची विक्री कार्यालयीन वेळेत दिनांक १४/११/२०२२ ते दिनांक २३/११/२०२२ पर्यंत सकाळी १०.३० ते सायं. ४.०० वाजेपर्यंत.
०२. निविदा फॉर्म दिनांक २३/११/२०२२ रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यंत स्विकारले जातील.
०३. निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी दु. ५.३० वाजता अथवा कार्यालयाचे प्रशासकीय सोयीप्रमाणे उघडणेत येतील.
०४. नोंदणीकृत व्यक्ती /संस्था/कंपनीने ग्राह्य नोंदणीपत्राची प्रत निविदा मागविणेच्या अर्जासोबत दर्शविल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.
०५. कामाचा अनुभव असेल अशाच व्यक्ती/संस्था/कंपनींना निविदा फॉर्म दिले जातील.
०६. निविदा द्विनोंद पद्धतीने सादर करणेच्या असून **लिफाफा क्र. १** मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्र, मागील ३ वर्षाचे आयकर रिटर्नस, जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र, कामगार भविष्य निर्वाह निधी नोंदणी प्रमाणपत्र, कामाचे अनुभवाचे दाखले, इसारा रक्कम भरल्याची पावतीची छायांकीत प्रत वगैरे कागदपत्र सादर करणे बंधनकारक राहील.तर **लिफाफा क्र. २** मध्ये स्वहस्ताक्षरात संपूर्ण भरलेला निविदा फॉर्म सादर करणेचा आहे.
०७. सशर्त निविदा नाकारली जाईल. कोणतीही एक निविदा स्विकारणेचा अथवा सर्वच निविदा नाकारणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.
०८. कामासंबधी अतिरिक्त माहिती नगरपरिषदेचे बांधकाम विभागात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस खेरीज) मिळू शकेल.


**जा.क्र. पेनप/का.४/बां.वि/२०२२ /२४७५**
**दिनांक : ९/११/२०२२**
**ठिकाण :- पेण**

**सही XXX**
**मुख्याधिकारी**
**पेण नगरपरिषद, पेण**

# वर्सोवा-विरार सागरी सेतू नवी मुंबई विमानतळास पोषक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ बांधित असलेल्या वर्सोवा-विरार सागरी सेतू आता एमएमआरडीए बांधणार आहे. भविष्यात या सेतूचा मोठा फायदा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला होणार आहे. महत्त्वाची बाब म्हणजे मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसाठी अर्थसाहाय्य करणाऱ्या जपानच्या जायका कंपनीने या रस्त्यासाठी ४० हजार कोटींचे अर्थसाहाय्य देण्याची तयारी दर्शविली आहे. यामुळे या मार्गाचे कामही लवकरात लवकरात हाती घेण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहे.



## खाडीपुलासही ठरणार उपयुक्त

**विस्तारित वर्सोवा-विरार सागरी सेतूचा एमएमआरडीएच्या प्रस्तावित मुंबई शहर आणि वसई-विरार प्रदेशाच्या विकासात मैलाचा दगड ठरणाऱ्या खाडीपुलासही मोठा फायदा होणार आहे. ३० किमीने कमी होऊन आठ लाख रहिवाशांसह मुंबई-गुजरात प्रवास करणाऱ्या लाखो वाहनचालकांना त्याचा फायदा होणार आहे. भाईंदर खाडीवरील हा पूल पाच किमी लांबीचा राहणार असून, तो ३०.६ मीटर रुंद असा सहापदरी राहणार आहे. या पुलावर एमएमआरडीए १० हजार ८१ कोटी ६० लाख रुपये खर्च करणार आहे.**

या मार्गासाठी आता ३२ हजार कोटींचा खर्च अपेक्षित होता. परंतु, तो ४० हजार कोटींच्या गेला असून, त्यासाठी जायका अर्थसाहाय्य देण्यास तयार असल्याचे महानगर आयुक्तांनी ऑक्टोबर महिन्याच्या एमएमआरडीएच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांना सांगितले.

रस्ते विकास महामंडळाने दक्षिण मुंबई ते पश्चिम उपनगरांसह उत्तर मुंबईला जोडणाऱ्या वर्सोवा ते विरार ते या ५४ किमीच्या तिसऱ्या सी-लिंकच्या सुसाध्यता अहवालास सप्टेंबर २०२१ मान्यता दिली. होती.

सध्या वरळी ते वांद्रा सागरी सेतूनंतर आता वांद्रा ते वर्सोवा या १७.७ किमीच्या सागरी पुलाच्या बांधकामाचे सात हजार कोटींच्या कंत्राटाचे कार्यादेश देण्यात आले आहेत. या पुलामुळे वांद्रा ते वर्सोवा हे दोन तासांचे अंतर हा पूल झाल्यावर १५ मिनिटांत कापता येणार आहे. हा संपूर्ण प्रकल्प ११ हजार ३३२ कोटींचा आहे.

एमएसआरडीसीने सर्व कागदपत्रे एमएमआरडीएला देण्याचे आदेश या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी दिले. ते मिळाल्यानंतर एमएसआरडीने ते संचालक मंडळासमोर ठेवून तातडीने सल्लागार नेमण्याची कार्यवाही करावी, असेही या बैठकीत ठरले आहे.

मुंबईच्या पश्चिम किनारपट्टीवरील हा संपूर्ण सागरी मार्ग भविष्यात ईस्टर्न फ्री वे आणि विरार-कॉरिडोरसह न्हावा-शेवा-शिवडी सी-लिंकला जोडण्यात येणार आहे. यामुळे पूर्व आणि पश्चिम उपनगरे अधिक जवळ येतीलच; शिवाय दक्षिण मुंबईसह नवी मुंबई गाठणेही अधिक सुकर होणार आहे. याचा फायदा भविष्यात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला होणार आहे.

# नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस आयुक्त कार्यालय अंतर्गत काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या. त्यामध्ये परिमंडळ-२ पोलीस उपायुक्तपदी पंकज डहाणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे, तर पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षकपदी अनिल पाटील यांची नियुक्ती झाली असून त्यांनी पदभार स्वीकारला आहे.

या पोलीस खात्यातील बदल्यांमध्ये रा.रा. पोलीस बल गट क्र.४ नागपूर येथे कार्यरत असलेले पंकज दिलीपराव डहाणे यांची नवी मुंबई आयुक्तालयातील परिमंडळ २ या ठिकाणी बदली करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक फोर्स १ महाराष्ट्र राज्य मुंबईचे तिरुपती काकडे यांची नवी मुंबई आयुक्तालयातील पोलीस उपायुक्त वाहतूक शाखा नवी मुंबई येथे बदली करण्यात आली आहे. पोलीस उपायुक्त परिमंडळ १ मिरा-भाईंदर-वसई-विरार येथील अमित काळे यांची पोलीस उपायुक्त नवी मुंबई गुन्हे शाखा येथे नेमणूक करण्यात आली आहे. पोलीस उपायुक्त परिमंडळ २ मिरा-भाईंदर-वसई-विरार येथील संजयकुमार पाटील यांची नवी मुंबई पोलीस उपायुक्त विशेष शाखा येथे बदली करण्यात आली आहे.

सीबीडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अनिल पाटील यांची पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षकपदी, तर त्यांच्या जागी वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक रवींद्र





परिमंडळ-२ उपायुक्तपदी पंकज डहाणे, तर पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षकपदी अनिल पाटील

दौंडकर यांची बदली तुर्भे पोलीस ठाणे येथे करण्यात आली आहे. नेरूळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक श्याम शिंदे यांची बदली नियंत्रण कक्ष नवी मुंबई येथे करण्यात आली आहे. तुर्भे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक राजेंद्र आव्हाड यांची दंगल नियंत्रण पथक करण्यात आली आहे. कोपरखैरणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप तिदार यांची आरबीआय या ठिकाणी बदली करण्यात आली आहे.


रबाळे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अजय भोसले यांची कोपरखैरणे पोलीस ठाणे येथे बदली करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे गुन्हे शाखा अ.मा.वा.प्र.कक्ष पराग सोनावणे यांची बदली गुन्हे शाखा येथे करण्यात आली आहे. कामोठे पोलीस पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उत्तम जगदाळे यांची बदली एनआरआय पोलीस ठाणे येथे करण्यात आली आहे. यातील अनेक अधिकाऱ्यांनी शनिवारी पदभार स्वीकारला.

# न्यायाधीशांसह अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या ४४ पदांना मंजुरी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्याच्या विधी व न्याय विभागाने या दोन्ही न्यायालयांसाठी न्यायाधीशांसह अधिकारी व कर्मचारी अशा ४४ पदांना मंजुरी दिली आहे. न्यायालयीन अधिकारी कर्मचाऱ्यांना मंजुरी दिल्यानंतर नवी मुंबईतील वकील आणि अशिलांनी आनंद व्यक्त केला आहे. यात १९ पदे ही जिल्हा व अतिरिक्त न्यायालयासाठी, तर १६ पदे दिवाणी न्यायालय वरिष्ठस्तरसाठीची आहेत. या पदांना ९ नोव्हेंबर रोजी मंजुरी देण्यात आली आहे.

नवी मुंबईसारख्या वाढत्या नागरीकरण होत असलेल्या शहरांतील कनिष्ठ



न्यायालयातील खटल्यांची संख्या तसेच फौजदारी आणि गुन्हेगारी खटल्यांचे प्रमाण पाहता उच्च न्यायालयाच्या न्यायालय स्थापना समितीने नवी मुंबईत जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय आणि वरिष्ठस्तर दिवाणी न्यायालय स्थापन्यास मान्यता दिल्यानंतर

### नवी मुंबईकरांना मिळणार दिलासा

***उच्च न्यायालयाच्या मानकानुसार प्रलंबित खटल्यांची संख्या किमान ५०० असावी, अशी अट आहे. नवी मुंबईत तर ही संख्या हजारोंच्या घरात आहे. शिवाय न्यायालयासाठी स्वतंत्र इमारत, न्यायाधीशांसाठी निवासस्थाने असावीत, अशा अटी आहेत. त्यांची पूर्तता नवी मुंबईत पूर्ण होत असल्याने आता आवश्यक अधिकारी व कर्मचारी मिळणार असल्याने नवी मुंबईकरांना मोठा दिलासा मिळणार आहे.***

गेल्या महिन्यात राज्य मंत्रिमंडळाने तशी मंजुरी दिली होती, मात्र त्यासाठीचे न्यायाधीश आणि कर्मचारी उपलब्ध नव्हते, म्हणून ही पदे मंजूर करण्यात आली आहेत.

जिल्हा न्यायालयाची पाच आणि दिवाणी न्यायालयाची ४ अशी ९ पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरता येणार आहेत. नवी मुंबईतील लोकसंख्या ज्या वेगाने वाढत आहे, त्याच वेगाने दिवाणी आणि फौजदारी गुन्ह्यांचे प्रमाणही वाढत आहे. शहरांत रुपये पाच लाख किंवा सात वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सजा होऊ घातलेल्या गुन्ह्यांचे प्रमाणही वाढले आहे. मात्र, अशा खटल्यांसाठी पोलीस, वकील, अशिलांना ठाणे जिल्हा न्यायालयात धाव घ्यावी लागत होती. तेथे आधीच प्रलंबित खटल्यांची संख्या मोठी आहे. यामुळे न्याय मिळण्यास उशिर होत होता. शिवाय तिथे जाण्या-येण्यासाठी वेळ, इंधन, पैसा खर्चही होत होता. यामुळे ठाणे जिल्हा न्यायालयातील प्रलंबित खटल्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने नवी मुंबईत जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयासह दिवाणी न्यायालय वरिष्ठस्तर स्थापन्याची मागणी होत होती, ती मान्य झाली आहे.

**“ नवी मुंबईत जिल्हा व अतिरिक्त न्यायालय नसल्याने आम्हाला अशिलांना घेऊन वारंवार ठाणे येथे धाव घ्यावी लागत होती, मात्र तिथे आधीच प्रलंबित खटल्यांची संख्या प्रचंड आहे. यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या जस्टिस ॲट डोअर या धोरणाला हरताळ फासला जात होता. न्याय मिळण्यास विलंब होत होता, परंतु नवी मुंबईतच जिल्हा व अतिरिक्त न्यायालय होणार असल्याने शहरवासीयांना त्याचा लाभ होईल.**

**-ॲड. रमेश त्रिपाठी**

# घणसोलीतील उद्यान परिसरात नशेखोरांचा वावर

## कारवाईची मागणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

घणसोली येथील सेंट्रल पार्कबाहेर रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात नशेखोरांचा वावर आहे. त्यामुळे शतपावली करण्यासाठी येणाऱ्या स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

घणसोली सेंट्रल पार्कच्या बाहेर नागरिकांच्या सोयीसाठी जॉगिंग ट्रकची उभारणी करण्यात आली आहे. या ठिकाणी बसण्यासाठी जागा असल्याने रात्रीच्या वेळेस कुटुंबीयांसोबत अनेक जण येथे वेळ घालवतात. अशातच या पार्कच्या बाहेर काही ठिकाणी पसरलेल्या अंधाराचा फायदा घेऊन खुलेआम नशा करण्याचे प्रकार होत आहेत. यामुळे परिसरातून ये-जा करणाऱ्या महिलांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. शिवाय, या परिसरात काही दारूची दुकाने असल्याने नागरिकांची डोकेदुखी अधिकच वाढली आहे. त्यामुळे पोलिसांनी सेंट्रल पार्क परिसरातील या नशेखोरांवर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.

## रात्रीच्या वेळीच दहशत

**रात्रीच्या वेळेस हे नशेखोर सेंट्रल पार्कमध्ये गेटवर चढून आत प्रवेश करतात. आठवड्यापूर्वी चार जणांच्या टोळक्याने अशाच प्रकारे गेटवरून आत प्रवेश केला होता, पण उद्यान विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांना वेळीच बाहेर काढल्यामुळे पुढील अनर्थ टळला. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणांवर होणाऱ्या या प्रकारांवर कडक कारवाईची मागणी होत आहे.**

**“ घणसोली सेंट्रल पार्कबाहेर काही नशेखोर बसतात. याबाबत कोपरखैरणे पोलिस ठाण्याला माहिती देण्यात आली आहे. तसेच उद्यान विभागाकडूनदेखील अनेक वेळा कारवाई करण्यात येते.**

**-गणेश देशमुख, उद्यान अधिकारी**

**“ घणसोली सेंट्रल पार्कच्या बाहेर असलेल्या जॉगिंग ट्रॅक परिसरात काही नशेखोर मुलींकडे घाणेरड्या नजरेने पाहतात. रात्रीच्या वेळी हा परिसर मुलींसाठी सुरक्षित नसल्याने बंदोबस्ताची गरज आहे.**

**-दीपा चौधरी, नागरिक**

# गरजू घटकांना जातीचे दाखले काढण्यासाठी कॅम्प

**उरण : वार्ताहर**

कोकण विभागीय आयुक्त तथा जिल्हाधिकारी रायगड डॉ. महेंद्र कल्याणकर, उपविभागीय अधिकारी रोहा उमेश बिरारी, तहसीलदार (तळा) अप्पासो कनशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उरण सामाजिक संस्थेच्या माध्यमातून शुक्रवारी (दि. ११) तळा तालुक्यातील कातकरी समाजाचे जातीचे दाखले काढण्यासाठी तहसील कार्यालय तळा येथे कॅम्प घेण्यात आला.



या कॅम्पमध्ये एकूण १३० फॉर्म्स भरून घेतले. तहसीलदार कन शेट्टी, निवासी नायब तहसीलदार मंगेश पालांडे, महसूल नायब तहसीलदार सुरेखा घुगे, मंडळ अधिकारी नेहा तांबडे, संजय ठाकर, तलाठी किशोर मालुसरे, अव्वल कारकून आरती पुरी, कारकून संदीप आखाडे, सामाजिक कार्यकर्ते सुरेश पवार उपस्थित होते. या कॅम्पचा फायदा बोरघर आदिवासी वाडीवरील आदिवासी लोकांनी घेतला, अशी माहिती उरण सामाजिक संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. राजेंद्र मढवी यांनी दिली.

# घणसोलीत बोलक्या कावळ्याची चर्चा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

आजवर आपण कुत्रा, पोपट, मांजर आणि कबुतरे पाळण्याची अनेकांना आवड असल्याचे पाहिले आहे, पण घणसोली गावातील दिलीप म्हात्रे यांच्या घरी गेल्या आठ वर्षांपासून कावळा राहत असून बोलणारा हा कावळा सध्या चर्चेचा विषय बनला आहे.

घणसोली गावातील दिलीप म्हात्रे यांना खाडीकिनारी असलेल्या साईबाबा मंदिराजवळ आठ वर्षांपूर्वी जखमी अवस्थेतील कावळ्याचे एक लहानसे पिल्लू सापडले होते. या कावळ्याची अवस्था बघता दिलीप म्हात्रे यांनी त्या पिल्लाला वाचवण्याचा निर्णय घेतला. दोन महिने त्याच्यावर उपचार करण्यात आले. सहा महिन्यानंतर पंखांची संपूर्ण वाढ झाल्यानंतर त्याला घराबाहेर सोडले असता. तो परत घरीच येऊ लागल्याने अखेर त्या कावळ्याला पाळण्याचा निर्णय त्यांनी घेतला. तेव्हापासून आजवर आठ वर्षांचा कालावधी उलटूनही कावळा घरातच त्यांच्या कुटुंबासोबत राहत आहे. या कावळ्याबरोबर त्यांनी चार घारींची पिल्ले आणि एक घुबडदेखील पाळले होते; पण पंखांची वाढ झाल्यानंतर तीन घारी उडून गेल्या; मात्र आजही म्हात्रे यांच्या घरात कावळा, घार आणि पोपट मनोमन रमले आहेत. याशिवाय ते सर्पमित्रदेखील असून त्यांनी आत्तापर्यंत असंख्य विषारी आणि बिनविषारी सापांना पकडून जीवदान दिले आहे.



### घरातील सदस्याप्रमाणे वागणूक

*दिलीप म्हात्रे यांनी कावळ्याचे राजा असे नाव ठेवले आहे. त्यांच्या नावाने हाक मारल्यावर कावळा त्या हाकेला साद देतो. आता तर दिलीप म्हात्रे यांची पत्नी गीता आणि १४ वर्षांची त्यांची मुलगी तेजस्वी यांच्यासोबतदेखील कावळ्यासोबत संवाद साधतात. त्यामुळे घरातील एक सदस्य असल्याची भावना म्हात्रे कुटुंबीयांमध्ये तयार झाली आहे.*

# स्पर्धेद्वारे स्वच्छतेबाबत प्रोत्साहन; महापालिकेचा उपक्रम

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत असलेले स्वच्छताविषयक विविध उपक्रम जास्तीत जास्त लोकाभिमुख होण्याकरिता तसेच नागरिकांच्या स्वच्छताविषयक वर्तणुकीमध्ये बदल घडविण्याकरिता माहिती, शिक्षण, प्रसार व जनजागृतीवर भर देण्यात येत आहे. हॉटेल्स, शाळा, सोसायट्या, मार्केट, शासकीय कार्यालये व हॉस्पिटल स्तरावर स्वच्छता स्पर्धा राबविण्यात येणार आहेत.



नवी मुंबई शहरातील नागरिकांना कचरा वर्गीकरण व कच-यावरील प्रक्रिया तसेच इतर स्वच्छताविषयक उपक्रम राबविण्यास प्रोत्साहन देणे तसेच या बाबींमध्ये सातत्य ठेवून रहिवाशांच्या सवयीत बदल घडविण्याच्या दृष्टीने नवी मुंबई शहरातील हॉटेल्स, शाळा, गृहनिर्माण संस्था, मार्केट असोसिएशन, शासकीय कार्यालये आणि हॉस्पिटल या प्रमुख सहा गटांमध्ये स्वच्छता स्पर्धा आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे गुणांकन करण्याकरिता ठराविक निकष निश्चित करण्यात आले असून त्यामध्ये प्रामुख्याने निर्मितीच्या ठिकाणीच कचरा वर्गीकरण, कचऱ्यावर कचरा निर्मितीच्या ठिकाणीच प्रक्रिया करणे, शौचालय व्यवस्थापन, स्वच्छता विषयक पायाभूत सुविधा व कोविड-१९ या आजाराचा प्रसार रोखण्याकरिता करण्यात आलेल्या नियमांचे पालन अशा विविध बाबींवर भर देण्यात आलेला आहे.

या स्वच्छता स्पर्धेमध्ये सहभागी होऊ इच्छिणा-संस्थांना ११ ते १५ नोव्हेंबर या कालावधीत संबंधित विभाग कार्यालयात अर्ज करता येणार आहेत. या स्पर्धेचे प्रत्यक्ष स्थळ परीक्षण व गुणांकन १५ ते २५ नोव्हेंबर या कालावधीत करण्यात येणार आहे. या स्पर्धेमध्ये नागरिकांचा उत्स्फुर्त सहभाग अपेक्षित असून नागरिकांना प्रोत्साहन मिळावे याकरीता विभाग स्तरावरून निवड करण्यात आलेल्या प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाच्या संस्थांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

**“ स्वच्छता ही दैनंदिन जीवनातील नियमित सवय व्हावी जेणेकरून शहर स्वच्छतेला बळकटी येईल या भूमिकेतून सोसायट्यांपासून ते हॉटेलसारख्या पर्यटक मोठ्या संख्येने येणाऱ्या व्यावसायिक संस्थांना स्वच्छतेच्या दृष्टीने प्रोत्साहित करण्यासाठी विविध सहा गटात स्वच्छता स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभागी होऊन स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान व स्वच्छ नवी मुंबई मिशन यशस्वीपणे राबविण्यास सक्रिय सहभाग नोंदवावा**

**-राजेश नार्वेकर, आयुक्त, न.मुं.म.पा.**

# प्री वेडिंग शूटसाठी नवी मुंबईला पसंती

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिकेकडून स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शहर सुशोभीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे नवी मुंबईतील पर्यटनस्थळे नवी मुंबईकरांसह उपनगरमधील रहिवाशांच्या पसंतीस उतरत आहे. अशातच जीवनातील महत्त्वाच्या क्षणाच्या आठवणी संग्रहित ठेवण्यासाठी प्री वेडिंग शूटसाठी या पर्यटनस्थळांना पसंती मिळत आहे.

फ्लेमिंगो सिटी म्हणून नावलैकिक मिळवलेल्या नवी मुंबईतील पुतळे, त्याचप्रमाणे आकर्षक रंगरंगोटीमुळे नवी मुंबईतीलच नाही तर मुंबई, ठाणे आणि पनवेल-उरणकरांना या शहराचे आकर्षण वाढले आहे. त्यात या शहराची रचना, चारही बाजूंनी येणारा सूर्यप्रकाश या जमेच्या बाजू लक्षात घेऊन सध्या नवी मुंबई शहराला प्री वेडिंग शूटसाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहेत. अशातच लग्नाचा हंगाम जोरात सुरु झाल्याने नववधुवरांचे फोटो काढण्याचा ट्रेण्ड सुरू आहे. त्यामुळेच जसे बजेट असेल, त्यानुसार ही प्री वेडिंग शूट केली जात आहेत. त्यात प्रामुख्याने पाम बीच मार्ग, नेरूळ तलाव, ज्वेल ऑफ नवी मुंबई, घणसोलीतील सेंट्रल पार्कला अधिक पसंती मिळत आहे.



**सोशल मीडियामुळे प्रसिद्धी**

सागर विहारच्या ठिकाणी असणारा खाडी किनारा व वाशी येथील उड्डाणपूल दिसत असल्यामुळे येथे शूट केले जाते. ज्वेल ऑफ नवी मुंबई या ठिकाणी थिंकर आणि डायमंडची असणारी प्रतिकृतीमुळे या ठिकाणी शूटिंग करणाऱ्यांची रिग लागते. सोशल मिडियावर इंस्ट्राग्रॉम, फेसबुक, व्हॉटसअप वर विविध पोझमध्ये फोटो काढून अपलोड करण्यासाठी या उद्यानांचा वापर करण्यात केला जातो. त्यामुळे या पर्यटनस्थळांना अधिक प्रसिद्धी मिळत आहे.

**“ लग्नाचा हंगाम सुरु होणार असल्यामुळे प्री वेडिंग शूटची क्रेझ वाढली आहे. नवी मुंबई शहारांमध्ये अनेक चांगली उद्याने तसेच सुशोभीकरण केलेल्या वास्तू असल्यामुळे त्या ठिकाणची निवड केली जाते. शहरामधून बाहेर जाण्यापेक्षा जवळच चांगल्या वास्तू असल्यामुळे कमी बजेट असणाऱ्यांना त्याचा लाभ घेता येतो.**

**-चेतन सांवत, फोटोग्राफर**

# रोजगारासाठी आगरदांडा पोर्ट लवकरच सुरू करणार

## आमदार महेंद्र दळवी यांचे आश्वासन; ग्रामपंचायतीच्या नूतन इमारतीचे उद्घाटन

**मुरुड जंजिरा : प्रतिनिधी**

दिघी पोर्टने स्थानिकांची बिले गेल्या कित्येक वर्षे थकवली होती. त्यांना त्यांची बिले मिळावीत तसेच नोकरीत स्थानिकांना प्राधान्य मिळावे यासाठी दिघी पोर्टचे काम थांबवण्यात आले होते, परंतु आता स्थानिकांनीच हे पोर्ट सुरू होण्याची विनंती केल्यामुळे येत्या आठ दिवसात दिघी पोर्टमधील आगरदांडा युनिट वेगाने सुरू होण्यासाठी माझी सहमती असून लवकरच हे युनिटसुद्धा शीघ्र गतीने सुरू होईल, अशी ग्वाही अलिबाग-मुरूड विधानसभा आमदार महेंद्र दळवी यांनी केले आहे. ते आगरदांडा येथील नूतन ग्रामपंचायत इमारतीच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलत होते.

(छाया : संजय करडे)





आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत आगरदांडा येथे १६ लाख रुपये खर्च करून नवीन ग्रामपंचायतीची इमारत बांधण्यात आली. या इमारतीचे उद्घाटन आमदार महेंद्र दळवी व आगरदांडा सरपंच रुशाली डोंगरीकर यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले.

या वेळी उपसरपंच युसूफ अर्जबेगी, मुरूड शिवसेना तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, विजय गीदि, ग्रामसेवक सुशांत ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य संतोष पाटील, नाहिदा डावरे, प्रीती भाटकर, शांताराम हिलम, भरती कांबळे, जिल्हा संघटिका शुभांगी करडे, अलिबाग तालुका प्रमुख प्रफुल्ल मोरे, संजय गांधी योजनेचे अध्यक्ष भरत बेलोसे, नांदगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच भाई सुर्वे, दिनेश मिणमिणे, निलेश घाटवळ आदी उपस्थित होते.

या वेळी आमदार दळवी म्हणाले की, अलिबागपेक्षा मुरूडचा जास्त विकास होण्यासाठी आपण जास्त लक्ष देणार आहोत. गावाचा सर्वांगिण विकास ज्या ग्रामपंचायत इमारतीमधून होतो ती इमारत सुसज्ज असावी यासाठी मी माझा आमदार निधी देऊ केला आहे. रायगड जिल्हा परिषदेत बदल होणे खूप गरजेचे आहे. रायगड जिल्हा परिषदेला खूप मोठा विकास निधी उपलब्ध होत असतो, जर बदल झाला तर सर्वाधिक विकासनिधी विविध गावांसाठी देऊन मोठा बदल घडवून आणू. आगामी निवडणुकीत लोकांनी बदल घडवून नगर परिषद व जिल्हा परिषद आमच्या ताब्यात द्या. आपणाला हवा असणारा विकास करून दाखवू, असा दावाही आमदार महेंद्र दळवी यांनी केला.

या वेळी आगरदांडाचे माजी सरपंच व शिवसेना तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर यांनी, आमदार दळवी यांचे ऋण व्यक्त करून ग्रामपंचायतीमधील पाणीपुरवठ्यासाठी नवीन पाईपलाईन देणे, अंतर्गत रस्ते अशा विविध कामांसाठी भरघोस निधी दिल्यामुळे गावाचा विकास करू शकलो, असे प्रतिपदान केले.

आगरदांडा ग्रामपंचायतीचे उपसरपंच युसूफ अर्जबेगी यांनी दिघी पोर्टमधील आगरदांडा युनिटचे काम जलद गतीने सुरू होण्यासाठी आमदार महेंद्र दळवी यांनी प्रयत्न करावेत अशी मागणी केली, तसेच आगरदांडा मुस्लिम समाजास मोठा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल विशेष आभारसुद्धा अर्जबेगी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन किसन कांबळी यांनी केले.

## निवडक



### डॉ. सुरेख पाटील यांना पुरस्कार

**पेण** : सुहित जीवन ट्रस्टच्या अध्यक्षा डॉ. सुरेखा पाटील यांना महासंस्कृती व्हेंचर्स आयोजित महासंस्कृती कोकण सन्मान २०२२ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, नरिमन पॉईंट, मुंबई येथे आयोजित सोहळ्यात प्रदान करण्यात आला. या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सुरेखा पाटील यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

### ठाकूरबेडी येथे काळभैरव जयंती उत्सव

**पेण** : ठाकुरबेडी येथे काळभैरव जयंती उत्सव १५ ते १६ नोव्हेंबरपर्यंत होणार आहे. मंगळवारी (दि. १५) काकडा, कलश पुजन व आरती, रात्रौ ९:३० वा. हभप मंदार गोखले



(पुणे) यांचे कीर्तन, रात्री १२ वा. कुलस्वामिनी भजन मंडळ जनवली यांचे हरिजागर तसेच बुधवारी (दि. १६) सकाळी ९:३० वा. हभप गोखले महाराज यांचे कीर्तन, रात्री ९.३० वा. संतोषी पाटील यांचे ओमसाई भजन मंडळाच्या वतीने भजन, तसेच जि. प. सदस्य प्रभाकर म्हात्रे यांच्या वतीने जीवदानी भजन मंडळ पैरणकरवाडी यांचे भजन, रात्री १२ वा. गणेश संगीत भजन मंडळ मंत्रीबेडी यांचे भजन तसेच रात्रौ १ वा. श्रींची प्रदक्षिणा होऊन कार्यक्रमाची सांगता होईल.

# कोपर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपचे नवनाथ म्हात्रे

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील प्रतिष्ठेच्या कोपर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी नवनाथ म्हात्रे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

कोपर ग्रामपंचायतीमध्ये गेली २० वर्षे नवनाथ म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली वर्चस्व राखले गेले आहे. भाजपचे उपाध्यक्ष नवनाथ म्हात्रे यांनी हा राजकीय वारसा अखंड सुरू ठेवला आहे. तालुक्यामध्ये एक विकसनशील ग्रामपंचायत म्हणून कोपर ग्रामपंचायतीकडे पाहिले जात आहे. उपसरपंच नवनाथ म्हात्रे हे आमदार रविशेठ पाटील यांचे खंदे कार्यकर्ते आहेत.

त्यांनी या गावांमध्ये नळ पाणीपुरवठा योजना, रस्ते, विजेचे प्रश्न, मच्छीमारांच्या समस्या व अनेक विकास कामे मार्गी लावले आहेत. नवनाथ म्हात्रे यांच्या निवडीबद्दल भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी त्यांचे अभिनंदन करून सत्कार केला.

(छाया : अनिस मनियार)



पेण तालुक्यात भाजपने आपले खाते उघडले असल्याचे वैकुंठ पाटील यांनी सांगितले. या वेळी ग्रामपंचायत सदस्य दमयंती म्हात्रे, संध्या मोकल, शरद म्हात्रे, उर्मिला भोईर, मयूर म्हात्रे, मयूर मोकल, हमरापुर विभाग भाजप अध्यक्ष भरत पाटील, युवा मोर्चा अध्यक्ष सूर्यहास पाटील, माजी सरपंच रामचंद्र म्हात्रे उपस्थित होते.

या वेळी प्रकाश मोकल यांनी निवडणूक अधिकारी म्हणून कार्यभार सांभाळला.

# माणगाव पोलिसांची सामाजिक बांधिलकी

## चार मनोरुग्णांना उपचारासाठी पाठविले रुग्णालयात

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव पोलीस आपले कर्तव्य पार पाडत असताना अनेक सामाजिक उपक्रम राबवित असतात. अशाच सामाजिक बांधिलकीतून माणगांव पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांनी माणगाव पोलीस ठाणे हद्दीत फिरणाऱ्या तीन व वाघाव बौद्धवाडी येथील एक अशा एकूण चार मनोरुग्णांना पुढील उपचारासाठी गुरुवारी (दि. १०) रुग्णालयात पाठविले आहे.

(छाया : सलीम शेख)



गेले अनेक वर्षांपासून माणगांवच्या एसटी स्टॅण्ड व परिसरात मंजिरी माधव पाठक ही महिला मनोरुग्ण अवस्थेत फिरताना संपूर्ण माणगांवकरांनी पाहिली होती, परंतु माणगाव पोलीस निरिक्षक राजेंद्र पाटील यांना ही मनोरुग्ण महिला व एक इसम अशा दोन मनोरुग्णांबाबतची माहिती मिळाली असता त्यांनी या दोघांना रत्नागिरी येथील वेड्यांच्या रुग्णालयात पाठविण्याचा निर्णय घेतला व ते पूर्णतः बरे होऊन परत आले असून आता त्यांच्या कुटुंबियांसोबत आहेत.

माणगाव पोलीस ठाणे हद्दीत फिरणाऱ्या तीन मनोरुग्णांना माणगाव पोलीस ठाणे येथे प्राथमिक उपचार करून व वाघाव येथील एका महिलेस असे एकूण चार जणांना मानवतावादी कोकण संस्थेच्या सहाय्याने पुढील उपचारकरिता रुग्णवाहिकेमध्ये बसवून ठाणे येथील रुग्णालयात पाठविण्यात आले.

अशा प्रकारे गावातील मनोरुग्ण केवळ दुर्लक्ष व उपचाराविना मोकाट फिरत असतात. यामुळे कायदा व सुव्यवस्थेला गालबोट लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळेच पोलिसांचे हे कार्य गौरवास्पद आहे.

# आमदार रविशेठ पाटील यांच्याकडून नळ पाणीपुरवठा योजनेची पाहणी



(छाया : राज वैशंपायन)

**नागोठणे : प्रतिनिधी**

पेण विधानसभा मतदार संघ नागोठणे विभागातील जलजीवन मिशन नळपणी पुरवठा योजनेची पाहणी शनिवारी (दि. १२) आमदार रविशेठ पाटील यांनी केली.

पळस, निडी, कोंडगाव, चिकणी, पाटणसई, वझरोली, बाळसई, कानसई, वरवठणे, वेळशेत, पिंगोडे, वणी येथील नळपाणी पुरवठा योजनेची पाहणी करण्यात आली.

या वेळी भाजपचे उपजिल्हा अध्यक्ष मारुती देवरे, महिला जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे, रोहा तालुका अध्यक्ष सोपान जांबेकर, सरचिटणीस आनंद लाड, नागोठणे शहराध्यक्ष सचिन मोदी, विवेक रावकर, अहिरे, सिराज पानसरे, तिरत पोलसानी, शेखर गोळे, सुभाष म्हात्रे, संतोष लाड, नीलिमा राजे, शितल नागरे, मुग्धा गडकरी, अपर्णा सुटे आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रलंबित मागण्यांबाबत विक्रम चालक मालक संघटनेचे निवेदन

**नागोठणे : प्रतिनिधी**

विक्रम चालकांच्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात शुक्रवारी (दि.११) आमदार भरत गोगावले यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनाद्वारे सद्या परिस्थितीला न परवडणारी इको चारचाकीऐवजी पर्यायी तीनचाकी सहा आसनी रिक्षा व कोरोना काळातील दोन वर्षे कालावधी वाढवून देण्याबाबत मागणी करण्यात आली.

या वेळी श्री गणेश चालक मालक संघटनेचे जनरल सेक्रेटरी जयराम खाडे, सुभाष शिर्के, हिरामण भोईर, अलिबाग संघटनेचे सुरेश घरत, कोलाड संघटनेचे विश्वास बागूल, चेतन परभळकर, योगेश सानप, माणगाव संघटनेचे सचिन धाडवे, निजामपूर संघटनेचे प्रदीप पवार, महाड पोलादपूर संघटनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. विक्रम चालक मालक संघटनेचे प्रश्न लवकरात लवकर सोडविले जाणार असल्याचे आश्वासन या वेळी आमदार गोगावले यांनी दिले.



# हनुमानपाडा येथे रक्तदान शिबिराला प्रतिसाद

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील हनुमानपाडा गाव येथे मनसे रायगड जिल्हा शारीरिक सेनेचे अध्यक्ष निकेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, तालुका अध्यक्ष प्रफुल पाटील व शहर अध्यक्ष आदित्य कदम यांच्या नियोजनाखाली भव्य रक्तदान शिबिर नुकतेच घेण्यात आले.



या शिबिराचे उद्घाटन ग्रामपंचायत सदस्य भाग्यश्री पाटील व पेण तालुका अध्यक्ष रुपेश पाटील यांच्या हस्ते व नरेंद्र पाटील, डॉ. गोसावी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या वेळी एकूण ४५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

रक्तदान शिबिरासाठी पोलीस पाटील लक्ष्मण पाटील, सुदर्शन पाटील, हिरामण जेधे, पेण तालुका उपाध्यक्ष हनुमान नाईक, साहिल म्हात्रे, रुपेश पाटील, सवैश पाटील व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते. सर्व रक्तदात्यांना या वेळी मनसे रायगड जिल्हा शारीरिक सेनेतर्फे प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

शारीरिक सेना पेण तालुका अध्यक्ष प्रफुल पाटील व पेण शहराध्यक्ष आदित्य कदम यांनी सर्व मान्यवर व रक्तदात्यांचे आभार मानून रक्तदान शिबिराचे योग्य नियोजन केले होते.

जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबागचे रक्त संकलन अधिकारी डॉ. गोसावी यांनी आणि त्यांच्या टीमचे रक्तदान शिबिरासाठी विशेष सहकार्य लाभले.

# शाळांमध्ये मैदानी खेळांना सुरुवात; विद्यार्थ्यांमध्ये उत्साह

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

दिवाळीनंतर जिल्ह्यातील शाळांमध्ये मैदानी खेळांना आता सुरू झाले आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील शाळांची मैदाने पुन्हा एकदा खेळाडूंनी बहरू लागली असून विद्यार्थ्यांमध्येही उत्साह दिसून येत आहे.

मार्च २०२०पासून जिल्ह्यात कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊन घोषित करण्यात आले होते. शाळा बंद ठेवल्याने अभ्यासाबरोबरच मैदानी खेळांनादेखील ब्रेक लागला होता, परंतु जून २०२२पासून शाळा पुन्हा नव्याने सुरू झाल्या आहेत. दिवाळीनंतर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या विद्यमाने तालुका स्तरावर क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. अलिबाग तालुक्यासह मुरूड, रोहा आदी ठिकाणी स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांकडून जोरदार सराव सुरू केला आहे.

अलिबाग तालुका क्रीडा स्पर्धेचा शुभारंभ जेएसएम महाविद्यालयात नुकताच झाला. १८ नोव्हेंबरपर्यंत या क्रीडा स्पर्धा होणार आहे. व्हॉलिबॉल, कबड्डी, खो-खो, कुस्ती, बुद्धीबळ अशा अनेक सांघिक व वैयक्तिक क्रिडा स्पर्धा होणार आहेत, तसेच सांघिक ॲथलेटिक्स, स्वीमिंग आदी खेळाचे प्रकारही असणार आहेत.

१४ ते १९ वयोगटातील मुले, मुलींच्या वेगवेगळ्या स्पर्धा होणार आहे. जिल्ह्यात तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा सुरू झाल्याने जिल्ह्यातील शाळा मैदानी खेळांनी बहरू लागले आहेत. या सर्वच मैदानी स्पर्धांमध्ये विद्यार्थीही मोठ्या संख्येने व अतिशय उत्साहाने सहभाग घेत असल्याने विविध स्पर्धांचे आयोजन शाळांमध्ये करण्यात येत आहे.

### विद्यार्थ्यांमुळे मैदाने बहरली

***एक वेगळा उत्साह व आनंद विद्यार्थ्यांमध्ये जाणवतो. विजय मिळवण्यासाठी शाळा-महाविद्यालयातील खेळाडू शर्थीचे प्रयत्न करीत आहेत. मोबाईलमध्ये रमणारी शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी या स्पर्धांमुळे मैदानी खेळात मग्न असल्याचे दिसून येत आहे.***



# इंग्लंडने पाकिस्तानला नमविले

## टी-२० विश्वचषक फायनलमध्ये करन, स्टोक्स चमकले



**मेलबर्न : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेत रविवारी (दि. १३) ऐतिहासिक मेलबर्नमधील एमसीजी मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात इंग्लंडने पाकिस्तानवर पाच गडी राखून मात केली. इंग्लंडच्या बेन स्टोक्सने झुंजार अर्धशतकी खेळी करीत संघाला विश्वचषक जिंकून दिला, मात्र मोक्याच्या क्षणी तीन गडी बाद करणाऱ्या सॅम करनला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.

पाकिस्तानने ठेवलेल्या धावांचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या इंग्लंडला पहिल्याच षटकात जबर धक्का बसला. मागील सामन्यात नाबाद अर्धशतक पूर्ण करणारा ॲलेक्स हेल्स शाहिन आफ्रिदीचा शिकार ठरला. चाचपडत खेळणारा फिल सॉल्टही केवळ दहा १० करून बाद झाला. कर्णधार जोस बटलरने झटपट २६ धावा ठोकल्या.

बटलर बाद झाला तेव्हा इंग्लंड संघ संकटात सापडला होता, पण अनुभवी स्टोक्सने हॅरी ब्रुकसह ३९ धावांची महत्त्वाची भागीदारी केली. अडखळत खेळत असलेल्या स्टोक्सने खराब चेंडू मिळताच पाकिस्तानचा गोलंदाज नवाझवर हल्ला चढवत इंग्लंडच्या विजयाचे दरवाजे खुले केले. मोईन अलीनेही वसीमला तीन चौकार ठोकत पाकिस्तानला सामन्यातून बाहेर नेले. स्टोक्सनेच आपले अर्धशतक पूर्ण करून संघासाठी विजयी धाव काढली.

तत्पूर्वी इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. इंग्लंडच्या गोलंदाजांनी आपला गोलंदाजीचा निर्णय सार्थ ठरवत पाकिस्तानला निर्धारित २० षटकांत ८ बाद १३७ धावांवर रोखले. फिरकीपटू आदिल राशिद व सॅम करनने उपांत्य सामन्यानंतर अंतिम सामन्यातही शानदार गोलंदाजी केली.

पाकिस्तानसाठी कर्णधार बाबर आझम व मोहम्मद रिझवान यांनी २९ धावांची सलामी दिली. रिझवान या सामन्यात केवळ १५ धावा करून बाद झाला. युवा मोहम्मद हॅरिस या सामन्यात अपयशी ठरला. कर्णधार बाबरने २८ चेंडूंत ३२ धावांची संथ खेळी केली. पाकिस्तानकडून शान मसूदने सर्वाधिक ३८, तर शादाब खानने २० धावांचे योगदान दिले.

इंग्लंडच्या गोलंदाजांनी धारदार गोलंदाजी करीत एकही पाकिस्तानी फलंदाजाला मोठी धावसंख्या उभारू दिली नाही. सॅम करनने टी-२० विश्वचषक अंतिम सामन्यात पाकिस्तानच्या फलंदाजीला खेळपट्टीवर तग धरू दिले नाही. त्याने चार षटकांत फक्त १२ धावा देत पाकिस्तानचे तीन फलंदाज बाद केले. याचबरोबर आदिल राशिदने बाबर आझम हा इंग्लंडसमोरील मोठा अडसर दूर केला. त्याने २२ धावा देत दोन गडी बाद केले.

ख्रिस जॉर्डननेही दोन बळी घेत इंग्लंड संघाला मदत केली. यामुळे पाकिस्तानला २० षटकांत आठ बाद १३७ धावांपर्यंतच मजल मारता आली. शान मसूदने सर्वाधिक ३८ धावा केल्या. इंग्लंडच्या बेन स्टोक्सने झुंजार अर्धशतकी खेळी करीत १० वर्षांनी संघाला विश्वचषक जिंकून दिला. या वेळी खेळाडूंनी मैदानात जल्लोष केला.

# कुस्ती स्पर्धेत उरणच्या अमेघा घरतला सुवर्णपदक

**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**




ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथील सोनुभाऊ बसवंत कॉलेजमध्ये मुंबई युनिव्हर्सिटीतर्फे घेण्यात आलेल्या कुस्ती स्पर्धेत उरण तालुक्यातील खोपटे गावची कन्या अमेघा अरुण घरत हिने ५७ किलो वजनी गटात सुवर्णपदक जिंकले. या कामगिरीमुळे तिची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

अमेघा घरत हिने या अगोदरही विविध कुस्ती स्पर्धांमध्ये दैदिप्यमान कामगिरी करीत पारितोषिके मिळविली आहेत. तिला प्रशिक्षक रूपेश पावशे यांचे मार्गदर्शन लाभले. शहापूर येथील कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविल्याने तसेच राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याने अमेघावर अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



# उरणमधील तीन फुटबॉलपटूंची निवड


**उरण : बातमीदार**

येथील सेवेन स्टार फुटबॉल अकॅडमीच्या तीन खेळाडूंची वेगवेगळ्या तीन स्पर्धांमध्ये निवड झाली आहे.

शिव रोहन म्हात्रे (वय ९) याची सिंगापूर येथे झालेल्या सिंगा कपसाठी मुंबईतून निवड झाली व त्याची निवड मुंबई फुटबॉल असोसिएशनमध्येही (एफएममध्ये) झाली. दुसरा पार्थ मांढरे (वय ११) याचीही निवड एफएममध्ये झाली, तर तिसरी दिव्या नायक या मुलीची निवड खेलो इंडियामध्ये १७ वर्षांआतील मुलींच्या संघात रायगडमधून खेळण्यासाठी झाली.

यातील शिव म्हात्रे हा संपूर्ण रायगड जिल्ह्यातून इतक्या कमी वयामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळणारा पहिला फुटबॉलपटू असावा, असे सेवेन स्टार फुटबॉल अकॅडमीचे संस्थापक प्रवीण तोगरे यांनी सांगितले.

उरणमध्ये चांगल्या प्रतीचे मैदान नसतानासुद्धा ही मुले-मुली उरणच्या बाहेर पडून आपल्या खेळाचे उत्तम प्रदर्शन करून उरणचे नावलौकिक करीत आहेत हे प्रत्येक उरणकराला अभिमान वाटावा असेच आहे. या तिनही फुटबॉलपटूंचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

# ऑस्ट्रेलियाच्या मॅक्सवेलला दुखापत

**सिडनी : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाच्या क्रिकेट संघाला ग्लेन मॅक्सवेलच्या रूपाने मोठा धक्का बसला आहे. मित्राचा वाढदिवस साजरा करताना अष्टपैलू मॅक्सवेलच्या पाय फ्रॅक्चर झाला आहे. त्यामुळे तो जवळपास तीन-चार महिने क्रिकेटपासून दूर राहणार आहे.

मॅक्सवेल हा टी-२० विश्वचषकात ऑस्ट्रेलिया संघाचा भाग राहिला आहे. त्याने विश्वचषकाच्या चार सामन्यांत ३९.३३च्या सरासरीने एकूण ११८ धावा केल्या. यादरम्यान त्याचा स्ट्राइक रेट १६१.६४ होता.

मॅक्सवेल मित्राच्या वाढदिवसाच्या पार्टीला गेला होता. तिथे तो मित्राच्या घरामागे अंगणात धावत येत असताना त्याचा पाय घसरला व फ्रॅक्चर झाला. पुढील आठवड्यापासून इंग्लंडविरुद्ध खेळल्या जाणाऱ्या मालिकेत मॅक्सवेलचा समावेश करण्यात आला होता.

# गव्हाण विद्यालयाचा खो-खो संघ उपविजेता



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथे झालेल्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत खो-खो प्रकारात रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण कोपर येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमधील १४ वर्षे वयोगटातील मुलींचा संघ उपविजेता मानकरी ठरला.

अत्यंत चुरशीच्या झालेल्या अंतिम लढतीमध्ये डी. डी. विसपुते विद्यालयाने केवळ एक गुणाच्या फरकाने बाजी मारून विजेतेपद पटकाविले. ग्रामीण भागातील गव्हाण शाळेच्या संघातील विद्यार्थिनींनी खो-खो या देशी खेळातील प्राविण्य दाखवून प्रेक्षकांची मने जिंकली.

या स्पर्धेत गव्हाण संघाची कर्णधार पूर्वा खोत, दृष्टी ठाकूर, वेदश्री पाटील, प्राप्ती नाईक व प्राची म्हात्रे या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट खेळी करून एकूण चार सामने खेळले आणि उपविजेते होण्याचा मान मिळविला. संघातील सर्व खेळाडूंना विद्यालयाचे क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर, मुख्याध्यापिका साधना डोईफोडे, उपमुख्याध्यापक व प्रभारी प्राचार्य प्रमोद मंडले यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल विद्यालयाचे आधारस्तंभ व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन, 'रयत'चे जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य अरुणशेठ भगत तसेच स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, विद्यालयाच्या प्राचार्य साधना डोईफोडे, प्रभारी प्राचार्य प्रमोद मंडले, 'रयत'चे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी व रवींद्र भोईर, लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर आदींनी अभिनंदन केले.

# पुढील विश्वचषकात काही चेहरे संघात बघायचे नाहीत

## वीरेंद्र सेहवागचा 'स्ट्रेट ड्राईव्ह'

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषकात भारताचा इंग्लंडच्याविरुद्ध झालेला पराभव कोट्यवधी भारतीयांच्या जिव्हारी लागणारा ठरला. त्यामुळे संघनिवडीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. टीम इंडियाचा माजी तुफानी फलंदाज वीरेंद्र सेहवाग यानेही पुढील विश्वचषकात आपल्याला काही चेहरे संघात बघायचे नाहीत असे म्हणत त्यांच्याऐवजी नवीन व युवा खेळाडूंना संधी देण्याबाबत भाष्य केले आहे.

माजी दिग्गज क्रिकेटपटू सुनील गावसकर यांच्या विचारांना सहमती दर्शवत सेहवाग म्हणाला की, सध्याच्या भारतीय संघातील काही खेळाडूंना २०२४मध्ये होणाऱ्या पुढील टी-२० विश्वचषकात पाहू इच्छित नाही. २००७ टी-२० विश्वचषकात महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वाखालील संघात तरुण खेळाडूंना प्राधान्य देण्यात आले होते. त्या वेळी अनेक दिग्गज व अनुभवी खेळाडूंनी माघार घेतली होती हेच एका विजयी संघाचे उदाहरण आहे.

मला कुणाच्याच मानसिकतेबद्दल बोलायचे नाही, परंतु मला खेळाडूंच्या निवडीत बदल झालेला नक्कीच बघायचा आहे. मला पुढच्या विश्वचषकात काही विशिष्ट चेहरे बघायचे नाहीत. २००७च्या टी-२० विश्वचषकात अनेक तरुण खेळाडू निवडण्यात आले. त्यांच्याकडून काहीच अपेक्षा नव्हत्या. मला पुढील टी-२० विश्वचषकासाठी अशाच प्रकारचा संघ निवडलेला पाहायचा आहे, ज्यांच्याकडून जिंकण्याची अपेक्षा कोणीही करणार नाही, पण हाच संघ खऱ्या अर्थाने भविष्यात चमकदार कामगिरी करेल, असे सेहवागने 'क्रिकबझ'शी बोलताना सांगितले.



**...तर मात्र परिणाम सारखाच असेल**

आताच तुम्हा भविष्याचा विचार करायला हवा तरच तुम्ही दोन वर्षांत एक संघ तयार करू शकाल. मला आशा आहे की निवडकर्ते ही बाब लक्षात घेतील. आता निवडकर्ते पुढच्या विश्वचषकापर्यंत राहतील का? पुढच्या वेळेपर्यंत नवी निवड समिती, व्यवस्थापन, नवा दृष्टिकोन असेल. त्यामुळे ते बदल करतील का? पण एक गोष्ट नक्की आहे की, पुढच्या विश्वचषकात आतासारखाच संघ व यंदाचाच दृष्टिकोन असेल तर मात्र परिणाम सारखाच असेल.



**पनवेल : उलवे सामाजिक संस्थेच्या माध्यमातून उलवे नोड से. १७ येथे स्थानिकांसाठी मोफत क्रिकेट प्रॅक्टिस नेटची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. याचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी गाव अध्यक्ष सुधीर ठाकूर, शेखर काशिद, सचिन आवटे, अनिल सनस, गुड्डू कनोजिया, मनोज सिंह, वांची सोमस्कांदान, अमित झा, किरण लोहकरे, अशोक पाटील, अल्पु कनोजिया, बिपिन भोसले, सोपान सूर्यवंशी, सौरभ पाटील, पल्लवी सुर्वे, किरण लोहकरे, सम्राट भगत, शाहरूख हुसैन, प्रमोद गावकर, नित्यानंद पांडे, सिद्धू खरे, ओमकार कदम, ऋषिकेश सणस आदी उपस्थित होते.**

# मुंबई इंडियन्सचा पोलार्डला अलविदा?

## एकूण पाच खेळाडूंना मिनी लिलावाआधीच केले करारमुक्त

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाचा टी-२० विश्वचषक स्पर्धेतील प्रवास सेमीफायनलमध्ये संपला. टीम इंडियाच्या लाजिरवाण्या पराभवाने भारतीय चाहत्यांची निराशा झाली, पण आता हळूहळू क्रिकेटरसिकांना आयपीएल २०२३चे वेध लागले आहेत. याच पार्श्वभूमीवर आयपीएल इतिहासातील सर्वांत यशस्वी असलेल्या मुंबई इंडियन्स संघाने आपल्या करारमुक्त खेळाडूंची यादी काऊन्सिलकडे सुपूर्द केली असल्याचे एक रिपोर्टनुसार सांगितले जात आहे.

यानुसार मुंबईने आपला 'मॅचविनर' फलंदाज कायरन पोलार्ड याला करारमुक्त करीत बाहेरचा रस्ता दाखवला असल्याची माहिती आहे.

मुंबई इंडियन्सच्या संघाने आपल्या पाच खेळाडूंना यंदाच्या मिनी लिलावाच्या आधीच करारमुक्त केले आहे, तर चेन्नई सुपर किंग्ज संघानेही आपल्या चार खेळाडूंना करारमुक्त केले असल्याची माहिती रिपोर्ट्सनुसार देण्यात आली आहे. पॉवर-हिटर कायरन पोलार्डला संघातून करारमुक्त करण्याचा मुंबई इंडियन्सचा निर्णय धक्कादायक असल्याचे मानले जात आहे. पोलार्ड २०१०पासून मुंबईसोबत आहे. पाचही विजेतेपदाच्या संघात त्याचा समावेश होता. त्याने आतापर्यंत १३ हंगामात १४७च्या स्ट्राईक रेटने तीन हजार ४१२ धावा केल्या आहेत, मात्र आयपीएल २०२२मध्ये त्याला ११ सामन्यांत केवळ १४४ धावाच करता आल्या. त्याचा संघाला फटका बसल्याने मुंबईने पोलार्डला करारमुक्त केल्याचे बोलले जात आहे.





मुंबई इंडियन्सने रोहित शर्मा, इशान किशन, जोफ्रा आर्चर, जसप्रीत बुमराह, सूर्यकुमार यादव, टीम डेव्हिड, ट्रिस्टन स्टब्स, डेवाल्ड ब्रेविस, तिलक वर्मा आणि डॅनियल सॅम्स यांना संघात कायम ठेवल्याचे समजते, तर टायमल मिल्स, फॅबियन एलन, हृतिक शोकीन, मयंक मार्कंडे आणि कायरन पोलार्ड यांना संघाबाहेर केले आहे.

पोलार्ड आणि मिल्स दोघे गेल्या हंगामात अपयशी ठरले, पण इतर तिघांना पुरेशी संधी मिळाली नाही. असे असले तरी आता या पाच जणांवर मिनी ऑक्शनमध्ये बोली लागणार आहे.

### 'सीएसके'नेही चार जणांना दाखविला बाहेरचा रस्ता

***चेन्नई सुपर किंग्ज संघाने आपला कर्णधार महेंद्रसिंग धोनी याच्यासह रवींद्र जाडेजा, शिवम दुबे, ऋतुराज गायकवाड, डेव्हॉन कॉनवे, मुकेश चौधरी, ड्वेन प्रिटोरियस, मोईन अली आणि दीपक चहर या खेळाडूंना संघात कायम ठेवले आहे, तर इंग्लंडचा गोलंदाज ख्रिस जॉर्डन, तामिळनाडूचा फलंदाज एन. जगदीशन, न्यूझीलंडचा स्पिनर मिचेल सँटनर आणि वेगवान गोलंदाज ॲडम मिल्न या चौघांना करारमुक्त केल्याची सूत्रांची माहिती आहे.***

# परिष पाटील 'कामोठे महोत्सव श्री'चा मानकरी

**उरण : बातमीदार**

कामोठे महोत्सव श्री शरीरसौष्ठव स्पर्धेत कोप्रोली गावाचे सुपुत्र परिष प्रकाश पाटील यांनी किताब पटकाविला, तर कळंबुसरे गावातील श्रीकांत कुमार पाटील यांनी ६५ वजनी गटात ग्रुप विजेतेपद पटकाविले. दोन्ही स्पर्धकांना पुरस्काराने गौरविण्यात आले.



शरीरसंपदा हीच खरी मौल्यवान संपत्ती आहे. पीळदार शरीरयष्टी बनविली पाहिजे अशी प्रत्येक तरुणाची इच्छा असते. झेंडा सामाजिक संस्था आणि कै. बळीराम राघो पावणेकर सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने कामोठे येथे आगरी-कराडी कामोठ्याचा महोत्सव भरविण्यात आला आहे. तरुणांना शरीरसौष्ठव क्षेत्रात व्यासपीठ मिळवून देण्यासाठी महोत्सवात शरीरसौष्ठव स्पर्धाही घेण्यात आली.

या स्पर्धेत तरुणांनी 'शक्तिप्रदर्शन' केले. या वेळी दर्शक उपस्थित होते. कोप्रोली म्हात्रे जिम येथील आशुतोष म्हात्रे यांनी त्यांच्या अधिपत्याखालील खेळाडूंना मार्गदर्शन केले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com